बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३० | बुधवार, दि.०१ ते ०७ जुलै २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027

# साडेबारा लाख किंमत असलेल्या हिरकणी कक्षात अंदाजे ९० हजाराचेच साहित्य?

हिरकणी कक्षाची अवस्था




**कक्ष बंद किंवा कुलूपबंद: अनेक बसस्थानके, सरकारी कार्यालये आणि रुग्णालयांमध्ये उभारण्यात आलेले हिरकणी कक्ष बहुतांश वेळा कुलूपबंद असतात. इतरांचा ताबा: काही ठिकाणी हिरकणी कक्षांचा वापर स्तनदा मातांऐवजी सुरक्षारक्षकांच्या किंवा इतर कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीसाठी किंवा साहित्याची साठवणूक करण्यासाठी केला जाते.अस्वच्छता व अपुरी सुविधा: उपलब्ध असलेल्या कक्षांमध्ये पिण्याचे पाणी, पंखा, वीज, बसण्यासाठी योग्य जागा किंवा बाळासाठी पाळणा यांसारख्या मूलभूत सुविधांचा अभाव असतो.**




हीच ती अंदाजपत्रकीय किंमतीनुसार ८९ हजार किंमतीची रिसेप्शन चेअर




हीच ती अंदाजपत्रकीय किंमतीनुसार ३४ हजार किंमतीची आरामदायी खुर्ची

**गोंदिया:-** जिल्ह्यातील महिला व बालविकास विभागाच्या वतीने जिल्ह्यात हिरकणी कक्ष निर्माण करण्याकरिता २.२८ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला. या कामाकरिता महाटेंडर या शासकीय वेबसाइटच्या माध्यमातून ई निविदा न करता गोंदियाच्या महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात तयार करण्यात येत असलेल्या १८ हिरकणी कक्ष निर्मितीकरिता जेम पोर्टलवरुन विविध साहित्य खरेदी केल्याचे उघड झाले आहे. महाटेंडरवर ई निविदा न करता कोट्यवधी रुपयाच्या या बांधकामाचे कंत्राट कोटेशन पद्धतीने देण्यात आले. २०२५-२६ या वर्षाकरिता विशेष म्हणजे १८ हिरकणी कक्ष तयार करण्याकरिता अंदाजपत्रकीय किंमतीनुसार सुमारे २.२८ कोटी रुपयाचा निधी जिल्हा नियोजन समितीने मंजूर केलेला आहे. यामध्ये एका हिरकणी कक्षाकरिता सुमारे १२ लाख ६८ हजार रुपयाचा खर्च निर्धारित करण्यात आल्याचे माहिती अधिकारातून समोर आले आहे. तर गेल्या दोन वर्षापूर्वी२०२३-२४ या आर्थिक वर्षात याच विभागाने १२ हिरकणी कक्ष तयार करण्याकरीता ९५ लाख ४१ हजार रुपये खर्च केलेला आहे. यात एका हिरकणी कक्षावर सुमारे ७ लाख ९६ हजार रुपयाच्या जवळपास निधी खर्च करण्यात आलेला आहे.या अंतर्गत २०२३-२४ या वर्षात तयार केलेल्या हिरकणी कक्षाचा स्तनदा महिलांनी किती लाभ घेतल्याची पडताळणी केले असता,बहुतांश हिरकणी कक्ष कुलूप बंद दिसून आले.त्या कक्षाकरीता नेमलेल्या महिला कर्मचारीचे काय यासंदर्भात माहिती अधिकार कायद्याच्या माध्यमातून आढावा घेतले असता कुठल्याही विभागाकडे याची नोंद नसून हे कक्ष कुलूपबंदच असल्याचे दिसून येत आहे.

| अंदाजपत्रकीय किंमत | |
|---|---|
| वस्तू | किंमत |
| वॉश बेशिन | ९०,०००/- |
| आरामदायक खुर्ची | ३४,०००/- |
| हाताने विणलेला पडदा | १,१२,८९९/- |
| बेड | १,४४,४८६/- |
| प्लेइंग किट फॉर चिल्ड्रन | ४९,२४६/- |
| कॅबिनेट रुम | ६,२५,६३२/- |
| ए.सी. | १,००,०००/- |
| टिव्ही | २२,०००/- |
| रिसेप्शन चेअर | ८९,७३७/- |

**गोंदिया जिल्ह्यात १८ हिरकणी कक्ष निर्मितीकरिता निवडलेल्या कंत्राटदार श्री स्वामी समर्थ मल्टी सर्विस कंपनीच्या व्यवस्थापकांना हिकरणी कक्षातील साहित्य पुरवठा व निर्मिती संदर्भात भ्रमणध्वनीवर विचारणा केले असता आम्ही अंदाजपत्रकानुसार नव्हे तर वर्कआर्डरनुसार साहित्य पुरवठा केला असून पुढील ३ वर्ष देखभाल दुरुस्ती करणार असल्याचे सांगितले.**




महिला व बाल विकास विभागाच्या वतीने नियोजन विभागाला सादर केलेल्या प्रस्तावातील वस्तूंच्या किंमती बघितल्यास यात प्रचंड कमिशनखोरी झाल्याचे नाकारता येत नाही. १२.६८ लक्ष किमतीच्या हिरकणी कक्षात अंदाजे जेमतेम ८० हजार ते ९० हजार किंमतीचे साहित्य परभणी येथील पुरवठादार श्री साई समर्थ यांनी पुरविल्याचे प्रत्यक्ष पाहणी दरम्यान आढळून आले आहे. अंदाजपत्रकीय किंमत व प्रत्यक्ष साहित्याची किंमत बघितल्यास २ कोटीच्यावर शासकीय निधी हडपल्याचे स्पष्ट होते.

प्रस्तावातील वरील किमती हया अवाजवी असून प्रत्यक्षात जेम पोर्टलवरुन खरेदी करण्यात आलेल्या वस्तूंच्या किंमतीत प्रचंड तपावत असल्याची शंका आहे. यावरुन या प्रकरणात कोट्यावधी रुपयाचा अपहार संगनमताने झाल्याचे दिसून येत असल्याने महिला व बाल विकास विभाग १८ हिरकणी कक्षाची मोका तपासणी करुन किंमती निश्चित करुन पुरवठादाराकडून वसुली करणार काय याकडे लक्ष लागले आहे.

## विभागाकडून माहितीची लपवा लपवी

**महिला व बालविकास विभागाच्यावतीने संबधित हिरकणी कक्ष बांधकाम विषयी झालेला खर्च व साहित्य पुरवठ्याबाबतची माहिती लपवित असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.लोकप्रतिनिधींचे कार्यकर्ते यासह अनेकांनी सदर माहिती मागितली असता ती माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे.यावरुन सदर विभागाने हिरकणी कक्ष निर्मितीकरीता पुरवठादारासोबत केलेल्या करारात नक्कीच घोळ असल्याचे स्पष्ट होत आहे.**




अंदाजपत्रकीय किंमतीनुसार १ लाख ४४ हजार रुपये किंमतीचे हिरकणी कक्षाकरिता खरेदी केलेले पलंग

**१८ हिरकणी कक्षापैकी ३-४ ठिकाणी जागा अद्यापही निश्चित नसल्याचे दिसून आले.देवरी,तिरोडा यासह काही ठिकाणी ६.२५ लक्ष रुपये किंमतीची कॅबीनेट रुम दिसून आली नाही,असे कक्ष कार्यालयाच्या इमारतीतील कक्षात साहित्य घालून तयार करण्यात आल्याचे दिसून आले.तर गोंदिया पंचायत समितीने हिरकणी कक्षाची मागणी केलेली नसतानाही त्याठिकाणी हिरकणी कक्ष मंजुर केल्याचे संबधित अधिकारी यांनाच माहित नसल्याचे दिसून आले. महिला बाल विकास विभागाने कोणत्या आधारे पुरवठादारास निधी वितरीत केला हे कळेनासे झाले आहे.**

# “कृषी दिनी’ राज्यस्तरीय कृषी पुरस्कारांचे होणार वितरण

**मुंबई :-** राज्यातील कृषी, फलोत्पादन, सेंद्रिय शेती आणि कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शेतकरी, महिला शेतकरी, तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २०२३ व २०२४चे राज्यस्तरीय कृषी पुरस्कार जाहीर केले आहेत. कृषी विकासासाठी केलेल्या योगदानाचा सन्मान करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. राज्यस्तरीय कृषी पुरस्कार हे कृषी क्षेत्रातील उत्कृष्टतेचे प्रतीक असून नव्या पिढीला प्रेरणा देणारे आहेत. हरित क्रांतीचे प्रणेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून बुधवार, १ जुलै २०२६ रोजी मुंबई येथे हा सोहळा होणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची भेट घेऊन या पुरस्कार सोहळ्यास उपस्थित राहण्यासाठी निमंत्रण दिले. या निमंत्रणाचा स्वीकार राज्यपाल यांनी केला असून त्यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न होणार आहे.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समिती बैठकीत पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली असून




शासनाने त्यास मान्यता दिली आहे. राज्यातील कृषी क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, उत्पादनवाढ, शाश्वत शेती, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि कृषी विस्तार क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा गौरव करण्यासाठी हे पुरस्कार दरवर्षी प्रदान करण्यात येतात.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली कृषी विभागाने राज्यातील विविध विभागांमधून कृषी क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेल्या पुरस्कारार्थ्यांची निवड केली आहे. १ जुलै २०२६ रोजी २०२३ व २०२४ या दोन्ही वर्षांतील राज्यस्तरीय कृषी पुरस्कार विजेत्यांचा सन्मान एकत्रितपणे केला जाणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, सेंद्रिय शेती, फलोत्पादन आणि शाश्वत कृषी विकासासाठी कार्य करणाऱ्या सर्व पुरस्कारार्थींनी राज्यासाठी आदर्श निर्माण केला आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न पुरस्कार, वसंतराव नाईक कृषिभूषण पुरस्कार, जिजामाता कृषिभूषण पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती) पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीमित्र पुरस्कार, युवा शेतकरी पुरस्कार, उद्यानपंडित पुरस्कार, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (सर्वसाधारण गट), वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार (आदिवासी गट), तसेच पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार आदी पुरस्कार देण्यात येणार आहेत. २०२३ व २०२४साठी वरील पुरस्कारांसाठी एकूण १८९ पुरस्कारार्थींचा गौरव करण्यात येणार आहे. निवड झालेल्या पुरस्कारार्थींचे कृषीमंत्री भरणे यांनी अभिनंदन केले आहे.

## विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाची निवडणूक १ जुलै रोजी

**मुंबई:** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या रिक्त असलेल्या उपसभापतीपदाची निवडणूक बुधवार, १ जुलै २०२६ रोजी होणार असल्याची घोषणा विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी केली.

सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ७ मधील तरतुदींचा वापर करून १ जुलै ही तारीख निश्चित केली आहे. या निवडणुकीसाठी इच्छुक सदस्यांनी आपले प्रस्ताव आणि लेखी सूचना मंगळवार, दि. ३० जून रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचे सचिव डॉ. विलास आठवले यांच्याकडे विधानभवनातील कक्ष क्रमांक ९०३ येथे सादर करण्यात आले.त्यानंतर अर्ज छाननी करण्यात आली.महायुतीकडून आमदार सचिन अहीर तर महाविकास आघाडीकडून आमदार ज.मो.अभ्यंकर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.विशेष म्हणजे ठाकरे गटाचे आमदार सचिन अहीर यांनी आज पक्ष बदल करीत शिंदे शिवसेनेत प्रवेश केला.प्रवेश करताच विधानपरिषद उपसभापतीपदाची उमेदवारी महायुतीकडून जाहीर करण्यात आल्याने राजकीय खळबळ उडाली असून ठाकरेंना पुन्हा एक धक्का देण्यात आला आहे.

## अनुसूचित जाती आरक्षणाच्या उपवर्गीकरणावरून राजकीय वातावरण तापले



**मुंबई :** महाराष्ट्रात अनुसूचित जाती प्रवर्गाच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. उपवर्गीकरण लागू होणार असल्याच्या चर्चांनंतर राज्यातील राजकीय वातावरण तापले असून, काही ठिकाणी समर्थन तर काही ठिकाणी विरोधात आंदोलनं होत आहेत. पावसाळी अधिवेशनातही या मुद्द्यावरून मोठा गदारोळ झाला. विरोधकांनी सरकारला घेरत उपवर्गीकरणासंदर्भातील अहवाल सार्वजनिक करण्याची आणि सर्व घटकांशी चर्चा केल्याशिवाय कोणताही निर्णय घेऊ नये, अशी मागणी केली.

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला. अनुसूचित जाती प्रवर्गातील आरक्षण हे संविधानिक अधिकार असून उपवर्गीकरणाच्या माध्यमातून समाजात फूट निर्माण होण्याची शक्यता आहे, असा दावा वडेट्टीवार यांनी केला. वडेट्टीवार यांनी न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी केली. अहवाल उपलब्ध नसताना त्यावर हरकती आणि सूचना मागवणे योग्य नाही. तसेच संवेदनशील विषयावर सर्व समाजघटकांशी चर्चा करूनच निर्णय घ्यावे, अशी मागणीदेखील त्यांनी केली.या मुद्द्यावर विरोधकांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेत सभात्याग केला. सरकारने चर्चा करण्याची संधी न दिल्याचा आरोप करत विरोधी पक्षाच्या आमदारांनी निषेध नोंदवला. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. अनुसूचित जाती प्रवर्गाच्या उपवर्गीकरणाबाबत राज्य सरकारने अद्याप कोणताही अंतिम निर्णय घेतलेला नाही, असे फडणवीस यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर ही प्रक्रिया सुरू असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात आला आहे. त्यावर हरकती आणि सूचना मागवण्यात आल्या आहेत, अशी माहिती त्यांनी दिली. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. सर्व बाजूंचा विचार केल्यानंतरच सरकार पुढील निर्णय घेईल, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. त्यामुळे महाराष्ट्रातील SC आरक्षण उपवर्गीकरणाचा अंतिम निर्णय अद्याप बाकी आहे.

## मंदार पत्की यांनी स्विकारला जिल्हाधिकारी पदाचा पदभार

**गोंदिया :-** भारतीय प्रशासकीय सेवेच्या २०१९ तुकडीचे अधिकारी मंदार पत्की यांनी गोंदिया जिल्ह्याचे नवे जिल्हाधिकारी म्हणून आज पदभार स्वीकारला आहे.



यापूर्वी यवतमाळ जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी फेब्रुवारी २०२४ ते जून २०२६ या कालावधीत प्रभावी नेतृत्व केले. श्री. पत्की नंदुरबार जिल्ह्यात तळोदा येथे प्रकल्प अधिकारी व उपविभागीय अधिकारी म्हणून कार्य करताना आदिवासी भागातील विकासकामांना गती दिली.बीड जिल्ह्यातील मूळ रहिवासी असलेले मंदार पत्की यांनी २०१९ च्या भारतीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत अखिल भारतीय क्रमांक २२ वा मिळिवला होता. त्यांनी पुण्यातील वीआयटी महाविद्यालयातून यांत्रिकी (मेकॅनिकल ) अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले आहे.गोंदिया जिल्ह्याचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी प्रशासन अधिक पारदर्शक, लोकाभिमुख आणि कार्यक्षम करण्यावर भर देणार असल्याचे सांगितले. नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवणे आणि विकासकामांना गती देणे हे आपले प्राधान्य असेल, असे त्यांनी नमूद केले.

## खाजगी,भाड्याच्या वाहनावर महाराष्ट्र शासनाची पाटी

**गोंदिया :** केंद्र, राज्य शासनाचे असलेले वाहन सोडून इतर खासगी, कंत्राटी व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या खासगी वाहनावर महाराष्ट्र शासन, भारत सरकार सेवार्थ लिहिलेले आढळल्यास कारवाईची तरतूद आहे.पोलिसांसह अन्य अधिकाऱ्यांचाही यामध्ये समावेश आहे. कारवाई टाळण्यासाठी वाहनावर महाराष्ट्र शासन किंवा भारत सरकार सेवार्थ अशी पाटी लावून फिरण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत परिवहन आयुक्तांनी अशा वाहनांवर कारवाईचे आदेश आरटीओंना दिले असले तरी जिल्ह्यात अशी पाटी लावून राजरोसपणे प्रवास केला जात आहे. अनेकदा ही वाहने खाजगी व कौटुंबिक कार्यक्रमांमध्येही दिसून येतात.

शासकीय वाहन व त्यावरील खर्च शासनाला पेलवत नसल्याने अधिकाऱ्यांसाठी भाड्याने वाहन उपलब्ध केली जातात. जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकाऱ्यांसाठी भाडेतत्त्वावर वाहने घेतली आहेत. नियमानुसार या वाहनांवर महाराष्ट्र शासन, भारत सरकार सेवार्थ अशी पाटी लावणे दंडणीय अपराध आहे. असे असताना या भाडेतत्त्वावरील




वाहनांवर महाराष्ट्र शासन, भारत सरकार सेवार्थ असे लिहीलेली पाटी दिसून येते. रुबाब मारण्यासाठी घरातील एखादा सदस्य सरकारी नोकरीत असला तरी सारे कुटुंबच अशी पाटी लावून फिरत असतात. यातही अनेकांचा काहीही संबंध नसताना केवळ पोलिस कारवाई टाळण्यासाठी, टोलनाक्यावर टोलमाफी मिळण्यासाठीही असे प्रकार करत असतात. राज्य शासनाकडील वर्ग एकच्या अधिकाऱ्यांना शासनाकडून वाहन पुरविले जाते. या वाहनावर महाराष्ट्र शासन असा उल्लेख करणे अनिवार्य आहे. त्यामुळे या वाहनांना पाटी लावण्यास शासनाची परवानगी आहे.

वाहनावर महाराष्ट्र शासन लिहून अनेक गैरप्रकार होतात. अगदी काही गुन्हेगारी कारवायाही झाल्याचे यापूवी घडले आहे. या प्रकारामुळे शासकीय पाटीचा गैरवापर झाल्याचे समोर आले आहे. वाहतूक नियमांचे पालन करण्यासाठी आरटीओचे पथक जिल्ह्यात फिरते. पथकाला असे वाहन आढळून आल्यास व ते खासगी, भाडेतत्त्वावरील असले तर त्यावर दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित आहे. परंतु आरटीओचेही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत आहे. केवळ शासकीय वाहनावरच महाराष्ट्र शासन लिहिण्यास परवानगी आहे. इतर वाहनांवरील उल्लेख दंडनीय अपराध असला तरी कारवाई होताना दिसून येत नाही.

## जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट लेटरहेडचा वापर करून ४ कोटींची फसवणूक; मुख्य सूत्रधार आशिष पिपरे अटकेत

**गडचिरोली:-** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नावाचा आणि लेटरहेडचा गैरवापर करून चक्क ४ कोटी रुपयांच्या विकासकामांच्या बनावट प्रशासकीय मान्यता (प्रमा) आदेश तयार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या गंभीर प्रकरणात गडचिरोली पोलिसांनी पहिली मोठी कारवाई करत, मुख्य संशयित आणि चामोर्शी नगरपंचायतीचा स्वीकृत नगरसेवक आशिष पिपरे याला रविवारी मध्यरात्री छत्रपती संभाजीनगर येथून बेड्या ठोकल्या आहेत. या कारवाईमुळे राजकीय आणि प्रशासकीय वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे.



जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट लेटरहेडवर त्यांची हुबेहूब स्वाक्षरी करून, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधीतून राबविण्यात येणाऱ्या विकासकामांसाठी खोटी प्रशासकीय मान्यता मिळवल्याचे दिसून आले आहे. प्रशासनाच्या सर्वोच्च स्तरावरील कागदपत्रांची फसवणूक झाल्याने हे प्रकरण अतिशय गंभीर मानले जात आहे.

अटक करण्यात आलेला आशिष पिपरे हा चामोर्शी नगरपंचायतीचा स्वीकृत नगरसेवक असून, त्याची पत्नी भाजपची नगरसेविका आहे.

तीन महिन्यांपूर्वीच भाजपमधून त्याची हकालपट्टी करण्यात आली आहे. ?भाजपमध्ये असतानाही त्याने काँग्रेसच्या कोट्यातून स्वीकृत नगरसेवक पद मिळवले होते. ?सत्तापक्षातील अनेक बड्या नेत्यांशी त्याची जवळीक असल्याची चर्चा आहे.


यापूर्वी एका माजी राज्यमंत्र्याचा स्वीय सहाय्यक म्हणूनही त्याने काम केले आहे. चामोर्शीत “अगरबत्ती प्रकल्पा’च्या नावाखाली महिलांची फसवणूक केल्याचे गंभीर आरोपही त्याच्यावर आहेत. पिपरेच्या अटकेनंतर आता तपासाने वेग घेतला आहे. पोलीस आता या प्रकरणातील ‌बनावट कागदपत्रांचे जाळेफ शोधून काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

## माओवाद्यांचा जंगलातील पुन्हा एक शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त

**गडचिरोली :-** जिल्ह्यातील माओवाद संपुष्टात आला असला तरी त्यांच्या पाऊलखुणा अजूनही कायम आहेत. माओवाद्यांकडून सुरक्षा दलांना धोका पोहचविण्यासाठी, तसेच घातपाताच्या कारवाया करण्यासाठी शस्त्रांच्या निर्मितीत वापरल्या जाणारे साहित्य पोलिसांच्या हाती लागले. छत्तीसगडकडील सीमावर्ती भागातील बालबेडाच्या जंगलात हे साहित्य जमिनीखाली पुरलेले होते. बॉम्ब शोधक आणि नाशक पथकाच्या मदतीने हे साहित्य हस्तगत करून नष्ट करण्यात आले.

या शस्त्रास्त्र कारखान्याची गोपनिय माहिती गडचिरोली पोलिसांना मिळाली होती. यापूर्वी २३ व २७ मे २०२६ रोजी केलेल्या कारवाईतही अशाच पद्धतीने जंगलातील शस्त्र निर्मिती कारखाना उद्ध्वस्त करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा दि.२७ जून रोजी जमिनीत लपवून ठेवलेले साहित्य हस्तगत करण्यात गडचिरोली पोलीस व सीआरपीएफच्या जवानांना यश आले.

पोलीस अधीक्षक एम.रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली सदर जंगल परिसरात विशेष अभियान पथक गडचिरोली आणि प्राणहिता यांच्या संयुक्त ६



तुकड्या, बिडीडीएसचे १ पथक व सीआरपीएफच्या पथकाने हे शोध अभियान राबविले. बालबेडाच्या जंगल परिसरात विशेष अभियान पथकांकडून घेरा घालुन बिडीडीएसच्या जवानांनी परिसराची कसून तपासणी केली असता, ५ ते ६ टन वजन असलेली १ लेथ मशीन, १५० नग क्लेमोर व बिजीएल पाईप्स, २२० नग १२ बोअर पाईप, २० नग रायफल रॉड, मेटल पट्टी इ. माओवादी साहित्य हस्तगत करण्यात आले. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली घटनास्थळावरुन मिळालेले सर्व माओवादी साहित्य पथकातील जवानांच्या सहाय्याने जागीच नष्ट करण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक एम.रमेश यांच्या आदेशाने आणि मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक (अभियान) कार्तिक मधिरा, अपर पोलीस अधीक्षक (प्रशासन) गोकुल राज जी., पोलीस उपअधीक्षक (अभियान) विशाल नागरगोजे यांच्या देखरेखीखाली विशेष अभियान पथक गडचिरोली व प्राणहिता, इंटेलिजन्स सेल, तसेच बीडीडीएस पथकातील जवानांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## संपादकीय

# रा.स्व.संघ रजिस्ट्रेशन का करत नाही?

संघाचे रजिस्ट्रेशन झालेले नाही आणि त्याने ते करायला हवे यासाठी कर्नाटकाचे गृहमंत्री मयंक खडगे यांनी मोहन भागवतांना पत्र पाठवले आहे की आपली एवढी मोठी संघटना कर्नाटक प्रांतामध्ये आहे तर ही संघटना कशासाठी आहे, तिचा उद्देश काय आहे, तिचे किती सभासद आहे आणि ती रजिस्टर्ड आहे का अशा प्रकारचे एक पत्र मोहन भागवतांना पाठवले आहे आणि मोहन भागवत किंवा संघाचे लोक त्या प्रश्नाला व पत्राला टोलवाटोलवीचे उत्तरे देत आहे आणि सांगत आहे की हिंदू धर्म रजिस्टर्ड नाही म्हणून संघ देखील रजिस्टर्ड नाही. तसे पाहिले तर कुठलाच धर्म रजिस्टर्ड नाही आणि संघाचे लोक तर सांगतात की संघ सांस्कृतिक संघटना आहे. मग धर्माचे उदाहरण कशासाठी?

### रजिस्ट्रेशन कायदा

भारतामध्ये इंग्रजांनी १८६० मधे रजिस्ट्रेशन कायदा आणला आणि त्या कायद्यानुसार सर्व संस्था, एनजीओ रजिस्टर करता येतात. रामकृष्ण मिशन ही संस्था १८६० साली रजिस्टर केली होती. रा. स्व. संघ ही सर्वात मोठी एनजीओ आहे अशी शेखी खुद्द प्रधानमंत्र्यांनी मागे मारली आहे. म्हणजे संघ एनजीओ म्हणून रजिस्टर्ड व्हायला हवा. पण धर्माचे उदाहरण देऊन तो आपले एनजीओपण लपवित आहे. खडगे यांच्या प्रश्नाला अशा प्रकारे एनजीओ म्हणून रजिस्ट्रेशन केले तर सर्व वाद थांबतील.

परंतु संघाचे हे उत्तर कुठल्याही कायद्यात बसणारे नाही आणि म्हणून संघ याचे उत्तर देईल असे दिसत नाही. परंतु कर्नाटकचे गृहमंत्री मयंक खडगे हे संघाला पुरून उरत आहे आणि प्रश्नांची सरबत्ती करून संघाला कोंडीत पकडत आहेत आणि संघ त्या कोंडीतून कसे बाहेर पडावे याची आखणी करत असणार.

परंतु संघ कायद्याला मानत नाही. याला कारण संघ स्वताला सरकारच्या वर समजतो. राज्याच्या वर म्हणजे सरकारच्या वर समजतो. अर्थात सरकारला दुय्यम समजतो. एवढेच नव्हे तर गोळवलकरांनी म्हटले आहे आम्ही देशाचे मालक आहोत. गोळवलकर म्हणतात संघ हिंदू राष्ट्राचा प्रतिनिधी स्वरूपच नाही तर ते तो हिंदु राष्ट्राचे स्वरूप म्हणून आपल्यासमोर आहे म्हणूनच ही भारताची संपूर्ण भूमी राष्ट्ररूपी संघाची व्हावी स्वामित्वाच्या भावनेने आपण आपल्या घरात सुख समाधानाने राहावे यासाठी तर आपला हा सर्व प्रयत्न आहे भीषणतम आपत्तीतही सुखा समाधानाने आणि वैभवाने आणि स्वाभिमानाने आपल्या या राष्ट्र रूपात आम्ही जीवित राहावे याच हेतूने शक्ती संचयाचा सर्वस्व पणाला लावून केलेला हा आपला प्रयत्न आहे. (श्री गुरुजी समग्र दर्शन, भाग १,पा.१०८)

मला वाटते देशांमध्ये अशा प्रकारची ही एकच संघटना आहे जी स्वतःला कायद्याच्या वर समजते व संविधानाला दुय्यम समजते. खरं म्हणजे संघाचे रजिस्ट्रेशन हे १९२५ लाच व्हायला पाहिजे होते. कारण इंग्रजांच्या कायद्याप्रमाणे त्यावेळी अनेक संघटना रजिस्टर झालेल्या आहेत उदाहरणार्थ रामकृष्ण मिशन ही १८६० साली नोंदणी झालेली संघटना आहे. मग १९२५ मध्ये स्थापन झालेली संघाची संघटना रजिस्टर का करत नाही? मोहन भागवतांचे म्हणणे आहे की ज्याप्रमाणे हिंदू धर्माचे रजिस्ट्रेशन नाही त्याप्रमाणे संघाचे पण रजिस्ट्रेशन नाही. म्हणजे संघ स्वतःला धर्म समजतो की काय?

कुठलाही धर्म हा रजिस्टर्ड असू शकत नाही कारण सरकारी कायदा येण्याच्या आधी धर्म स्थापन झालेले आहेत. सरकार आल्यावर मग कायदे लागू होतात ते सगळ्या संघटनांना लागू होतात. संघ धर्म आहे असं कुठल्या नाकाने म्हणू शकतो? संघ हिंदू धर्म मानतो त्या धर्माचे रक्षण करतो हिंदूंना एकत्र करतो अशा प्रकारची भूमिका घेतो म्हणजे संघ धर्म ठरु शकत नाही.

आणि त्याच वेळेस तो मनुवादी आहे हे पण सांगतो म्हणून तो संविधानाला मानत नाही. जे संविधान बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वात निर्माण झाले आहे त्याचा राग संघाला आहे. संविधानामध्ये मनुस्मृतीचे कायदे असावे अशा प्रकारची सूचना गोळवकरांनी केली होती. आणि म्हणून संघाचा संविधानावर राग आहे म्हणजे इथल्या कायद्याला संघ जुमानत नाही. आजचे संघवादी सरकार देखील त्यांच्यावर दबाव आणू शकत नाही.

आजचे प्रधानमंत्री संघाचे स्वयंसेवक आहेत. म्हणजे संघाच्या तालमीत वाढलेले स्वयंसेवक आहे आणि म्हणून त्याची भूमिका ही संघाचीच आहे. म्हणजे संघ म्हणतो की आम्ही रजिस्ट्रेशन करणार नाही तीच भूमिका प्रधानमंत्री मोदी यांना घ्यावी लागणार आहे. कारण ते संघाला बांधील आहे.

काँग्रेसच्या सत्ता काळात देखील हा प्रश्न निर्माण व्हायला पाहिजे होता. परंतु काँग्रेसने याबाबतीमध्ये कानाडोळा केला आणि म्हणून संघाचे फावले. असं म्हणता येईल की संघाला काँग्रेसच्या लोकांनी मदत केलेली आहे. म्हणून संघ वाढत गेला आणि तो आपल्या मनमर्जीप्रमाणे वागू लागला.

### राष्ट्र आणि राज्य

गोळवलकरांचे एक प्रसिद्ध पुस्तक आहे, We or Our N>ationhood Defined. त्या पुस्तकात ते राष्ट्र आणि राज्य या दोन संस्थांचा उहापोह करतात आणि दोन प्रकारांमधील भेद सुद्धा सांगतात. ते म्हणतात की राष्ट्र हे राज्याच्या वर असते (नेशन इज अबॉव्ह दी स्टेट.) राज्याच्या वर राष्ट्र असते किंवा सरकारच्या वर राष्ट्र असते.

हे गोळवलकरांनी जे लिहिले आहे ते चातुर्वर्ण्याच्या रचनेनुसार आहे. चातुर्वर्ण्यात ब्राह्मण हा क्षत्रियाच्या, वैश्य व शूद्राच्या वर आहे. म्हणजे राजा वा क्षत्रिय हा ब्राह्मणाच्या आज्ञा पाळणारा असतो. गोळवलकरांनी राष्ट्र हे राज्याच्या वर म्हटले आहे ते संबंध चातुर्वर्ण्याच्या संदर्भात आहे. म्हणजे राज्य किंवा राजा हा दुय्यम स्थानी आहे. म्हणजे मोहन भागवत ब्राह्मण आणि नरेंद्र मोदी क्षत्रिय भूमिकेत आहेत. ब्राह्मण राजाला आदेश देतो राजा किंवा क्षत्रिय ब्राह्मणाला आदेश देऊ शकत नाही. म्हणजे संघ मोदींना आदेश देऊ शकतो पण उलट घडणार नाही. म्हणजे सरकार संघाला रजिस्टर्ड करा असा आदेश देऊ शकत नाही. दुसरे म्हणजे आधी लिहिल्याप्रमाणे प्रमाणे संघ आम्ही देशाचे मालक आहोत असेही म्हणतो. मग.....?

आता मंत्री खडगे संघाला रजिस्टर्ड करा यासाठी जे प्रश्न विचारत आहेत त्याला संघाच्या राष्ट्र राज्य या भूमिकेप्रमाणे हे उत्तर असायला हवे की संघ सरकारच्या वर आहे. म्हणून संघ रजिस्ट्रेशन करणार नाही. पण अजून तरी संघाने असे उत्तर दिले नाही. आता हे पाहावे लागणार की संघ ही भूमिका जाहीरपणे मांडणार की वेगळ्या पद्धतीने कर्नाटकचे गृहमंत्री खडगे यांच्या प्रश्नाची वाट लावणार.

इथले बाकी पक्षाचे लोक मात्र राष्ट्र संकल्पनेबद्दल काही बोलत नाहीत. ते फक्त सरकार बद्दल बोलतात परंतु राष्ट्र संकल्पनेबद्दल ते अनभिज्ञ असतात किंवा ते गंभीरपणे विचार करत नाहीत. नाही तर संघाच्या हिंदू राष्ट्राला पर्याय द्यायला पाहिजे अशा प्रकारची भूमिका त्यांनी घेतली असती. पण तसे होताना दिसत नाही. सर्व राजकीय पक्ष स्टेट वा राज्य संकल्पनेत , सरकार प्रकारामध्ये मश्गुल आहेत. सरकारच्या वर राष्ट्र असते वा आहे हे त्यांच्या गावीही नाही. ते संघाच्या हिंदू राष्ट्राचा विचार करत नाही. आणि म्हणून संघ फोफावत गेला.

मनुचा मासा नावाचे एक पुस्तक अमरावतीच्या प्रा.कु. ल. आणि म हाले यांनी लिहिलेले आहे. त्यात मनुचा मासा कसा अक्राळ विक्राळ वाढत गेला याचे विवेचन केले होते. खरं म्हणजे त्याच वेळी संघाच्या भूमिकेला वेसन घालायला हवी होती. परंतु काँग्रेस पक्ष देखील ब्राह्मण वर्चस्ववादी होता म्हणून संघासाठी दोर ढिले ठेवले व या माशाची अफाट वाढ होऊ दिली. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या व्हाट काँग्रेस अँड गांधी ह्याव डन टू दी अनटचेबल्स या पुस्तकात ब्राम्हण प्रामुख्याने सत्ताधारी जमात आहे असे म्हटले आहे.

गांधी खुनानंतर व नंतरही ज्या बंदी संघावर आणल्या त्यामुळे संघाची शक्ती कमी न होता वाढत गेली. आणि आता तर संघ निर्मित पक्ष सत्ताधारी आहे. त्यामुळे मयंक खडगे यांच्या आव्हानाला संघ कसा सामोरे जाणार हे पाहता येईल.

### संघावर बंदी

मयंक खडगे संघावर बंदी आणावी असेही म्हणतात. संघावर आता पर्यंत तिनदा बंदी आणण्यात आली आहे. पहिली ४ फेब्रुवारी १९४८ मध्ये गांधी खुनानंतर आणि बंदी आणर्णा?या दिल्ली सरकारने कारण नमूद केले आहे कारण दिले आहे ङ्गडेंजर टू दी पब्लिक पीसङ्ग . अर्थात शांतीवरील संकट असे म्हटले आहे. दुसरी बंदी आणीबाणी मध्ये आणली होती आणि तिसरी बाबरी मस्जिद विध्वंसामुळे. याला कारण जातीय हिंसक दंगली करणे दिले आहे. कर्नाटक सरकारने बंदी आणली तरी केंद्रात तसे होणे शक्य आहे?

**नागेश चौधरी**

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायक्षेत्र)**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी !

भारत हा कृषिप्रधान देश असून देशाच्या अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेतील एक महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर राहणाऱ्यांना उपजीविका देण्याचे काम हा महत्वपूर्ण घटक करतो. म्हणूनच शेती हा घटक अन्न सुरक्षा,रोजगार आणि ग्रामीण विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावतो.

मात्र गेल्या काही वर्षांपासून सतत होणारे हवामान बदल, जमीन आणि पाण्याची टंचाई, बियाणे आणि खतांवरील वाढता खर्च आणि बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे शेतीसमोर अनेक आव्हाने दिवसेंदिवस वाढत आहेत. या समस्येचे निराकरण करण्यासाठी राज्य शासन अनेक उपाययोजना करत असते जसे की, शेतीचे उत्पादन वाढविणे, हवामान बदलास अनुकूल आणि शाश्वत शेतीला चालना देणे, सिंचन व्यवस्था आणि जलसंधारणात सुधारणा करणे आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे. याशिवाय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरासाठी प्रोत्साहित करणे, शेतकरी गटांना बळकट करणे आणि बाजारपेठ उपलब्धतेत सुधारणा आणणे यासारखेही प्रयत्न केले जात आहेत.

मात्र आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी गेली काही वर्षे अनेक नैसर्गिक व आर्थिक संकटांचा सामना करत आहेत. कधी दुष्काळ, कधी अतिवृष्टी, कधी गारपीट यामुळे शेतपिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होत आहे. या सगळ्याचा परिणाम अनेकदा वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा भाव यामुळे अनेक शेतकरी कर्जबाजारी होतात. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी शासनाकडून राबविण्यात येणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना महत्त्वाची ठरते. शेतकरी कर्जमुक्ती योजना म्हणजे शेतकऱ्यांनी बँका किंवा वित्तीय संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची संपूर्ण किंवा अंशतः माफी. शासनाच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा कमी होतो, आणि त्यांना नव्याने शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळते. कर्जमाफीमुळे शेतकऱ्यांच्या मानसिक तणावात घट होते. तसेच त्यांच्या आर्थिक स्थैर्याला आधार मिळतो. कर्जमुक्तीनंतर शेतकरी नव्याने पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये गुंतवणूक करू शकतात. यामुळे उत्पादन वाढीस मदत होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी उभारी मिळणार आहे.

तथापि, कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरील कायमस्वरूपी उपाय नाही. शेती क्षेत्रातील मूलभूत अडचणी दूर करण्यासाठी सिंचन सुविधा, पीकविमा, साठवणूक व्यवस्था, बाजारपेठेपर्यंत थेट पोहोच, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि शेतीमालाला योग्य हमीभाव यांसारख्या उपाययोजनांची आवश्यकता आहे. शेतकरी हा देशाचा अन्नदाता आहे. त्याच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी




आणि शेती व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी कर्जमुक्तीसारख्या योजनांची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र, दीर्घकालीन विकासासाठी शाश्वत कृषी धोरणे आणि सर्वसमावेशक ग्रामीण विकास हाच खरा मार्ग आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल आणि ग्रामीण भारताच्या विकासाला नवी दिशा मिळेल.

### राज्य शासनाकडून शेतकऱ्यांसाठी विविध योजना

राज्य शासनाकडून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबविल्या जातात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वालंबन योजना, बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, नमो शेतकारी महासन्मान निधी योजना, प्रधानमंत्री किसान मानधन योजना राबविल्या जातात. यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांना विविध प्रकारचे आर्थिक सहाय्य देण्यात येते. याशिवाय प्रधानमंत्री पीक विमा योजना आणि हवामानावर आधारित फळिपक विमा योजना याद्वारे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे पीक आणि फळिपकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येते. किमान आधारभूत किंमत योजना इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार असे उपक्रम सुद्धा गेल्या काही वर्षात सुरू करण्यात आले आहेत.

### कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्ता (AI) याचा वापर

महाराष्ट्रात करण्यात येत आहे. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धीमत्ता आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी ङ्गमहाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धीमत्ता धोरण (महा कृषी एआय)फ २०२५-२०२९ आणले आहे. याअंतर्गत शेतकऱ्यांना उपग्रह तंत्रज्ञान आणि भौगोलिक माहितीच्या आधारे पिकांची स्थिती, जमिनीचा ओलावा आणि इतर भौगोलिक घटकांचे विश्लेषण करणाऱ्या प्रणालीचे विकसन व अंमलबजावणी करण्यात येणार आहे. कृषी आणि अन्न उत्पादनाच्या खरेदी- विक्रीसाठी एआय आधारित प्लॅटफ फॉर्म विकसित करण्यात येणार आहे.

### शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन

शेतकऱ्यांना देण्यात येणारी कर्जमुक्ती हा शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे साधन आहे. या योजनेअंतर्गत ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी करण्यात येणार असून सुमारे ५६ लाख शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. ही राज्यातील सर्वात मोठी कर्जमुक्ती आहे.कर्जमुक्ती हा कायमस्वरूपी उपाय नसला तरी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी तो आवश्यक ठरतो. शेतकरी पुन्हा उभा राहावा आणि त्याला नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा व्हावा, यासाठी कर्जमुक्तीकडे राज्य शासन एक महत्त्वाचे साधन म्हणून पाहते. राज्य शासनाने कर्जमाफीसंदर्भात तज्ज्ञ समिती नेमून या समितीला अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना, तसेच बँकिंग व्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्याची जबाबदारी दिली होती. समितीच्या अहवालाच्या आधारे काही निकष निश्चित करण्यात आले आहेत.

राज्य महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विविध कर्जमाफी योजना राबविल्या आहेत. दुष्काळ, अतिवृष्टी आणि इतर संकटांमुळे प्रभावित झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य शासनाने विविध कालखंडात कर्जमुक्तीचे निर्णय घेतले. या योजनांमुळे लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून त्यांना पुन्हा शेती व्यवसाय उभा करण्याची संधी मिळाली.

शेतकऱ्यांच्या समस्या केवळ कर्जमाफीने पूर्णपणे सुटू शकत नाहीत. त्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरणार आहेत:

* सिंचन सुविधांचा विस्तार
* पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी.
* शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर.
* साठवणूक व प्रक्रिया उद्योगांची उभारणी.
* शेतीमालाला योग्य व हमीभाव.
* शेतकरी उत्पादक कंपन्या आणि सहकारी संस्थांचे बळकटीकरण.
* कृषी शिक्षण व कौशल्य विकास.
* हवामान बदलाशी सुसंगत शेती पद्धतींचा प्रसार.

शेतकरी कर्जमुक्ती ही आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी दिलासादायक आणि आवश्यक उपाययोजना आहे. ती शेतकऱ्यांना नव्याने उभे राहण्याची संधी देणार आहे. याशिवाय ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. येत्या काळात शाश्वत कृषी विकासासाठी सिंचन, तंत्रज्ञान, बाजारपेठ, विमा आणि योग्य किंमत या घटकांचा समन्वय महत्वाचा ठरणार आहे. शेतकरी सक्षम झाला तरच देशाची अन्नसुरक्षा, ग्रामीण विकास आणि आर्थिक प्रगती अधिक बळकट होणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे**
उपसंचालक (वृत्त) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# शेतकरी,शेतमजुरांच्या मागण्यांसाठी तिरोड्यात आंदोलन




**तिरोडाः-** तिरोडा विधानसभा क्षेत्रातील शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार युवक, विद्यार्थी, महिला, वृद्ध कलाकार व विविध योजनांतील लाभार्थी यांच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, या मागणीसाठी शेतकरी, शेतमजूर, युवा बेरोजगार संघटनेच्या वतीने सोमवारी (ता. २९) येथील गांधी पुतळा परिसरात आंदोलन करण्यात आले. त्यानंतर मुख्यमंत्र्यांच्या नावे तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

आंदोलनात माजी आमदार दिलीप बन्सोड, राधेलाल पटले, वाय. टी. कटरे, रमेश टेंभरे, ओम पटले, रमेश आंबुले,सशेंद्र भगत, जगदीश येरोला,ओमप्रकाश कटरे,राजकुमार पटले,शिव नागपूरे,लक्ष्मीनारायण दुबे,महेंद्र भांडारकर,हितेंद्र बावने यांच्यासह शेतकरी, महिला, युवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करण्यात यावी, खरीप धानाचे थकीत पैसे व बोनस तातडीने द्यावा, बियाणे व रासायनिक खते शासकीय दरात उपलब्ध करून द्यावीत, खतांच्या वाढलेल्या किमती कमी कराव्यात, बेरोजगार युवकांना तत्काळ रोजगार उपलब्ध करून द्यावा, जिल्हा मध्यवर्ती बँकेमार्फत शेतकऱ्यांना पीककर्जाचे वितरण त्वरित करावे, बँकांमध्ये पुरेशा रोख रकमेची व्यवस्था करावी, कृषिपंपांना २४ तास वीजपुरवठा करण्यात यावा, धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा-२ चे पाणी शेतकऱ्यांच्या हितासाठी भदभद्या तलावात सोडावे, वाढीव वीजबिले कमी करावीत, स्मार्ट मीटरची सक्ती रद्द करावी, अदानी पॉवर प्रकल्पात स्थानिक युवकांना नियमित रोजगार द्यावा, वृद्ध कलाकारांचे थकीत मानधन त्वरित अदा करावे आदी मागण्या आंदोलनकर्त्यांनी यावेळी केल्या.

विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवरही आंदोलनकर्त्यांनी आवाज उठवला. नीट व टीईटी परीक्षांतील कथित पेपरफुटी प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांना न्याय मिळावा तसेच गोंदिया जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करावे, लाडकी बहीण योजनेतून वगळण्यात आलेल्या पात्र महिलांना पुन्हा लाभ मिळावा, नामंजूर अर्जांचा फेरविचार करून मंजुरी द्यावी, संजय गांधी निराधार, इंदिरा गांधी भूमिहीन आणि श्रावणबाळ योजनेचे प्रलंबित अनुदान तातडीने वितरित करावे, आदी मागण्या आंदोलनकर्त्यांनी केल्या.

## नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प मलॉकफ थेट १ ऑक्टोबर रोजी उघडणार गेट

**गोंदिया :-** धकाधकीच्या जीवनात काही क्षण निसर्ग सान्निध्यात घालविण्यासाठी अत्यंत उपयुक्त असे स्थान असलेला नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प ३० जून रोजी पर्यटनासाठी बंद होणार आहे. थेट १ ऑक्टोबर रोजी प्रकल्पाचे कुलूप उघडणार असल्याने पर्यटकांचा मात्र हिरमोड होणार आहे.

जिल्ह्याला नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प एक वरदान लाभले आहे. प्रकल्पात विविध प्रकारच्या वन्यप्राण्यांसोबत वाघोबाचे हमखास दर्शन होत असल्यामुळे मोठ्या संख्येत पर्यटक प्रकल्पात जंगल सफारीसाठी येतात. शिवाय, रोजच्या धकाधकीच्या जीवनातून काही वेळ काढून निसर्ग सान्निध्यात घालविण्यासाठीही पर्यटकांची येथे नेहमीच रेलचेल असते. मात्र, पावसाळा सुरू झाल्यामुळे पावसाळा हा जंगलातील अंतर्गत कामकाजासाठीचा काळ असतो. शिवाय, विणीचा हंगाम असल्यानेही प्रकल्प आता मंगळवारपासून (दि. ३०) पर्यटनासाठी बंद केला जाणार आहे. तर थेट १ ऑक्टोबर रोजी प्रकल्पाचे गेट उघडले जाणार आहेत.

# सौंदड येथे विदर्भ अग्रो एजंसीच्या कुबोटा शोरुमचे थाटात उदघाटन



**गोंदियाः-** जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यातील ट्रक्टर नगरी असलेल्या सौंदड(रेल्वे)येथे नुकतेच विदर्भ अग्रो एजन्सीच्या कुबोटा शोरुन उदघाटन व प्रात्यक्षिक सोहळा उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाकरीता विशेष पाहुणे म्हणून श्रीमंत डॉ. मुधोजीराजे भोसले

महाराजा ऑफ नागपुर,परिणय फुके सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद,सुनीलभाऊ फुंडे अध्यक्ष, भंडारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बैंक,प्रफुल्ल गुडधे पाटील काँग्रेसचे राष्ट्रीय सचिव तथा नागपूर शहर काँग्रेस अध्यक्ष,प्रशांत पवार प्रदेश प्रवक्ते, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष,निलेश कानवडे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,हर्ष मोदी, सरपंच सौंदड,कौशल आनंद मॅनेजिंग डाइरेक्टर धर्मशिला बेल्टींग प्रा. लि.,

राज कंवर गर्ग जनरल मॅनेजर धर्मशिला बेल्टींग प्रा. लि.,राजन चुघ, चीफ ऑफिसर एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेड,आशुतोष देशमुख, एसोशिएट वाइस प्रेसिडेंट एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेड,सचिन राजमाने, झोनल बिजनेस मॅनेजर एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेड,विष्णु राठोड, हेड ॲग्री सोल्युशन बिजनेस,अभिषेक कुमार, झोनल सेल्स मॅनेजर ॲग्री सोल्युशन बिजनेस,नीळकंठ राठोड, रिजनल बिजनेस मॅनेजर एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेड,ब्रजेश तिवारी, रिजनल सर्व्हिस मॅनेजर एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी परिसरातून आलेल्या शेतकरी बांधवाना उच्चशक्तीच्या ट्रक्टरचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले.तसेच खरेदी केलेल्या शेतकयाना ट्रक्ट्रचे वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाच्या आयोजनाकरीता विदर्भ ॲग्रो एजन्सीज, सौंदड चे एलेटी राजा व पंकज इंगळे यांनी परिश्रम घेतले.

## फुलचूर ग्रामपंचायतमध्ये मान्सूनपूर्व आढावा बैठक



**गोंदिया :-** फुलचूर ग्रामपंचायत येथे मान्सूनपूर्व आढावा बैठकीचे आयोजन गुरुवारी (दि. २५) जि.प. सदस्य संजय टेंभरे यांच्या अध्यक्षतेत करण्यात आले होते. बैठकीत प्रभाग क्रमांक १ ते ५ मधील साफसफाई व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, अतिक्रमण, बंद नाल्या, बंद नाला आणि पावसाळ्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण अडचणींवर चर्चा करण्यात आली. या समस्या मार्गी लावण्याचे निर्देश संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या.

पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये अशा सूचना देण्यात आल्या आहेत. याप्रसंगी माजी सभापती स्नेहा गौतम, सरपंच मिलन रामटेककर, उपसरपंच सुरेश सोनवाने, सुकचंद येळे, दुर्गाप्रसाद नागपुरे, आम्रपाली उके, सुनीता लिल्हारे, किरण पटले, रविकांता नागपुरे, रोहिणी भांडारकर, ताराचंद नागपुरे, देवचंद बिसेन, महेश बंसोड, नरेश चौधरी, लोकेश उपराडे, महेन्द्र शहारे, सुरेन्द्र दमाहे, ग्रामविकास अधिकारी मेश्राम, डॉ. सोनाली गौतम, अनिल रहांगडाले उपस्थित होते.

# भीमनगर-सिंगलटोली येथील प्रकरण उड्डाणपूल बांधकामाची नागरिकांची मागणी

**गोंदिया :-** नागपूर-रायपूर रेल्वे मार्ग आणि गोंदिया-चंद्रपूर रेल्वे मार्गादरम्यान अडकलेल्या आंबेडकर वॉर्ड, सिंगलटोली व भीमनगरातील नागरिकांनी मोठ्या संख्येत एकत्र येऊन चंद्रपूर मार्गावर सुरू असलेले अंडरपासचे बांधकाम बंद पाडले. शनिवारी (दि.२७) घडलेल्या प्रकारानंतर वरिष्ठ अभियंता मल्लिकार्जुन राव यांनी घटनास्थळी भेट दिली असता नागरिकांनी आपली व्यथा मांडत उड्डाणपुलाची मागणी केली.

शहरातील आंबेडकर वॉर्ड, सिंगलटोली व भीमनगर हे क्षेत्र नागपूर-रायपूर रेल्वे मार्ग आणि गोंदिया-चंद्रपूर रेल्वे मार्गाच्या दरम्यान अडकलेले मोठ्या लोकसंख्येचे क्षेत्र आहे. या क्षेत्रात शाळा, डीएड-बीएड कॉलेज आणि लहान-सहान



उद्योग आहेत. रेल्वेने पूर्वी नागपूर-रायपूर मार्गावर क्रॉसिंग बंद करून कमी उंचीचे अंडर पास दिले आहे. ज्यामुळे मोठ्या वाहनांचे फिरणे बंद झाले आहे. विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या बस, आपत्कालीन रूग्णवाहिका, आवास बांधणीसाठी ट्रक, जेसीबी, बोअरवेल मशीन, वीज विभागाची वाहने इत्यादींच्या येण्या-जाण्यात अडचण वाहने इत्यादींच्या येण्या-जाण्यात अडचण निर्माण झाली आहे.त्यामुळे भीमनगर रेल्वे क्रॉसिंगवरूनच ये-जा करता येत आहे. अशा परिस्थितीमध्ये आता चंद्रपूर रेल्वे मार्गावर अंडर पासचे बांधकाम सुरू करून जनतेवर अत्याचार, अन्याय करण्याचे कार्य रेल्वे करत असल्याचे जनतेच्या वतीने प्रतिनिधित्व करणारे सामाजिक कार्यकर्ते अमित भालेराव यांनी सांगितले, दक्षिण-पूर्व-मध्य रेल्वे लोकांची सुविधा न पाहता आवडीने कार्य करत आहे. अंडरपास बांधकाम सुरू करणे म्हणजे येथील जनतेवर अन्याय करणे आहे असेही त्यांनी सांगितले.

उड्डाणपुलाच्या मागणीला घेऊन डीआरएम नागपूर विभाग व जिल्हाधिकाऱ्यांना दोन वेळा पत्र दिले. मात्र त्याचा काहीच फायदा न झाल्याने अंडरपासचे बांधकाम थांबविण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्याचेही भालेराव यांनी सांगितले.तसेच लवकरच वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून उड्डाणपुलाच्या बांधकामाची गोष्ट लक्षात आणून देत क्षेत्राच्या नागरिकांनी पाठवलेल्या पत्रांना गांभीर्याने घेत लवकरच एक उच्चस्तरीय बैठक घेऊन समाधानकारक रस्ता शोधतील असे आश्वासन दिले.

# आम्हाला डावलून जिंकून दाखवाच!

**साकोली:-** कोहळी समाजावर वारंवार राजकीय अन्याय केला जात आहे. शब्द देऊनही डावलले जात आहे. हा अन्याय आतापर्यंत खूप झाला. यापुढे सहन केला जाणार नाही. आम्ही कोहळी समाजाची राजकीय ताकद प्रत्येक पक्षांना दाखवू, यापुढे आम्हाला डावलून निवडणुका जिंकून दाखवाच, असे थेट आव्हान पत्रकार परिषदेतून भारतीय जनता पक्षाचे वरिष्ठ नेते तथा केंद्रीय कोहळी समाज विकास मंच नागपूरचे अध्यक्ष प्रकाश बाळबुधे यांनी दिले.

आपल्या हक्कांसाठी आणि पूर्व विदर्भातील कोहळी समाजाच्या संघटित शक्तीचे प्रदर्शन करण्यासाठी केंद्रीय कोहळी समाज विकास मंडळ (नागपूर) आणि कोहळी पाटील संघर्ष मंच यांच्या संयुक्त विद्यमाने साकोलीत २९ जूनला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यापूर्वी झालेल्या पत्रकार परिषदेतून समाज संघटनेच्या नेत्यांनी वरील इशारा दिला. यावेळी समाजाचे नेते ललित बाळबुद्धे, नाना नाकाडे, अमोल मुंगमोडे, प्रकाश बाळबुद्धे, प्रणय खुणे, गजानन डोंगरवार, डॉ. श्याम हटवादे आदी उपस्थित होते.बाळबुधे म्हणाले, यापूर्वी समाजाचे नेते पक्ष प्रथम नंतर समाज या न्यायाने चालत होते; परंतु आता प्रथम समाज नंतर पक्ष हे धोरण अंगीकारले जाईल. दोन लोकसभा आणि सात विधानसभा क्षेत्रात कोहळी समाज निर्णायक असून, पूर्व विदर्भातील जवळपास ४०० हून अधिक गावांमध्ये कोहळी समाजाचे प्राबल्य असल्याचा दावा यावेळी करण्यात आला. कोहळी समाजाचे समन्वयक ललित बाळबुद्धे यांनी राजकीय पक्षांच्या भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, आमच्या समाजाला फक्त मतदानापुरते गृहित धरले जाते.

राजकीय पक्षांकडून अल्पसंख्याक म्हणून आमची उपेक्षा केली जाते. हा समाज प्रामुख्याने ८० टक्के भाजपचा पारंपरिक मतदार असून उर्वरित २० टक्के काँग्रेस व राष्ट्रवादीकडे विभागलेला आहे. या मोठ्या संख्याबळाची ताकद पाठीशी असतानाही राजकीय पक्षांकडून समाजाला नगण्य समजून राजकीय वाटा शून्यावर आणला जातो, याची खंत त्यांनी व्यक्त केली.



### मेळाव्यात दिवसभर झाले राजकीय विचारमंथन

दरम्यान दिवसभर चाललेल्या या मेळाव्यात राजकीय विषयांवर आणि पुढील दिशा काय असावी यावर विचारमंथन झाले. निवडणुकांमध्ये नेत्यांकडून समाजाचा फक्त मतांसाठी वापर केला जातो. समाजाला प्रतिनिधीत्व देण्याची वेळ येते तेव्हा मात्र नाकारले जाते. या मुख्य मुद्यावरच दिवसभर हे विचारमंथन झाले. दुपारी सुरु झालेला हा समाजमेळावा सायंकाळी ८ वाजतापर्यंत सुरु होता. यात अनेकांनी मते मांडली. समाजातील तरुणांना राजकीय व्यासपीठावर प्रतिनिधीत्व मिळावे असे मतही यावेळी मांडण्यात आले. विशेषतः अलीकडेच झालेल्या विधानपरिषद निवडणुकीत भाजपाकडून आलेल्या अनुभवाबद्दल असंतोष दिसला

# "मोठी स्वप्ने पाहा:" राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा गडचिरोलीतील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश

## राष्ट्रपती भवनात विद्यार्थ्यांचे आत्मीय स्वागत; भविष्यातील ध्येय जाणून घेत साधला मनमोकळा संवाद

**गडचिरोली:–** "मोठी स्वप्ने पाहा, शिक्षणाच्या बळावर ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा," असा प्रेरणादायी संदेश देत भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळांमधील ९६ आदिवासी विद्यार्थ्यांचे राष्ट्रपती भवनात अत्यंत आत्मीयतेने स्वागत केले. विद्यार्थ्यांना चॉकलेट देत त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधत नाव, गाव, शिक्षण आणि भविष्यातील ध्येयाविषयी विचारपूस केली. देशाच्या प्रथम नागरिकांशी झालेला हा संवाद विद्यार्थ्यांसाठी आयुष्यभर स्मरणात राहणारा प्रेरणादायी क्षण ठरला.

जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना अंतर्गत आयोजित करण्यात आलेल्या दिल्ली शैक्षणिक सहलीत गडचिरोली, अहेरी आणि भामरागड येथील शासकीय आश्रम शाळांमधील ९६ विद्यार्थी सहभागी झाले आहेत. काल राष्ट्रपती भवनात पोहोचताच विद्यार्थ्यांचे उबदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी म ुर्मू यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांचे नाव, ते कोणत्या गावातून आले आहेत, कोणत्या वर्गात शिक्षण घेत आहेत आणि भविष्यात काय बनण्याची इच्छा आहे, याची उत्सुकतेने विचारपूस केली.

संवादादरम्यान गडचिरोली जिल्ह्यातील पोटेगाव येथील एका विद्यार्थ्याने, ङ्कमी भविष्यात शिक्षक बनणार आहे,ङ्क अशी इच्छा व्यक्त केली. विद्यार्थ्याचे ध्येय ऐकून राष्ट्रपतींनी त्याचे कौतुक केले आणि शिक्षणात सातत्य, मेहनत व चिकाटी ठेवून मोठी स्वप्ने पूर्ण



करण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा सल्ला दिला. राष्ट्रपतींच्या या आत्मीय संवादामुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि आत्मविश्वास निर्माण झाला.

**राष्ट्रपती भवनाची सफर; ऐतिहासिक वारशाचा प्रत्यक्ष अनुभव**

भेटीनंतर विद्यार्थ्यांना राष्ट्रपती भवनातील विविध ऐतिहासिक दालने, भव्य वास्तू, परिसर आणि अन्य महत्त्वाच्या भागांची विशेष सफर घडविण्यात आली. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक संस्थेचे कार्य, राष्ट्रपती भवनाचा इतिहास आणि त्याचे वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य यांची माहिती विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून मिळाली. राष्ट्रपती भवन प्रशासनातर्फे विद्यार्थ्यांसाठी अल्पोपहारची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. या आदरातिथ्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

दिल्ली शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थी संसद भवन, पंतप्रधान संग्रहालय, राष्ट्रीय विज्ञान केंद्र, आयआयटी दिल्ली, जंतरमंतर, राजघाट, लाल किल्ला, कुतुबमिनार तसेच राष्ट्रीय प्राणीसंग्रहालय यांसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या स्थळांनाही भेट देत आहेत. या भेटींमधून विद्यार्थ्यांना देशाची लोकशाही व्यवस्था, विज्ञान–तंत्रज्ञानातील प्रगती, सांस्कृतिक वारसा आणि उच्च शिक्षणाच्या संधींची व्यापक माहिती मिळत आहे.

# शहरातील उड्डाणपुलाच्या कामाला दिली फेब्रुवारी २०२७ची डेडलाइन

## ६० टक्के काम पूर्ण : रेल्वे विभागाची मंजुरी : गर्डर तयार करण्याचे काम सुरू

**गोंदिय:** – बालाघाट म ार्गावरील उड्डाणपुलाचे काम मागील तीन वर्षापासून सुरू आहे. हे काम लांबल्याने शहरवासीयांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शिवाय शहरात वाहतूक कोंडीच्या समस्येत वाढ झाली आहे. सध्या या उड्डाणपुलाचे ६० टक्के काम पूर्ण झाले असून, ४० टक्के काम शिल्लक आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी फ ेब्रुवारी २०२७ची डेडलाइन आहे. या कालावधीत काम पूर्ण करावे लागणार आहे.

गोंदिया – बालाघाट मार्गावरील जुना उड्डाणपूल जीर्ण झाल्याने तो पाडून नवीन पूल तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले. शहराच्या दोन्ही भागाला जोडणारा हा महत्वपूर्ण उड्डाणपूल आहे. मात्र, मागील तीन वर्षापासून या उड्डाणपुलाचे बांधकाम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याने शहरवासीयांना त्रास सहन करावा लागत आहे. उड्डाणपुलाअभावी सर्व वाहतूक अंडरग्राऊंड मार्गे सुरू आहे. मात्र, हा पूल अरुंद आणि पावसाळ्यात या ठिकाणी गुडघाभर पाणी साचत असल्याने या मार्गावरून ये–जा करणे कठीण झाले आहे. बरेचदा या ठिकाणी वाहतूक कोंडी होत असल्याने शहरवासीयांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. पुलाच्या कामामुळे रेलटोली, रामनगर, कुडवा परिसरातील नागरिकांना दोन तीन किमीचा फेरा मारून यावे लागत आहे. या भागातील छोट्या व्यावसायिकांचा



### रेल्वे विभागाची मंजुरी

**शहरातील गोंदिया – बालाघाट मार्गावरील उड्डाणपूल हा रेल्वे रुळांवरून गेला आहे. त्यामुळे या परिसरात गर्डर टाकण्याचे काम करण्यासाठी रेल्वे विभागाची मंजुरी आवश्यक आहे. यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने पत्र दिले होते. त्यानंतर रेल्वे विभागाची मंजुरी मिळाली असून, लवकरच या भागातील कामाला सुरुवात केली जाणार आहे.**

### पुन्हा आठ महिने शहरवासीयांना सहन करावा लागणार त्रास

**शहरातील गोंदिया– बालाघाट मार्गावरील उड्डाणपुलाचे बांधकाम गेल्या तीन वर्षांपासून आहे. यामुळे शहरातील वाहतूक कोंडीत वाढ झाली आहे. शिवाय शहरवासीयांच्या समस्येत वाढ झाली आहे. मात्र, पुलाचे बांधकाम पूर्ण होण्यास पुन्हा आठ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे शहरवासीयांना वाहतूक कोंडीच्या समस्येला आणखी आठ महिने तोंड द्यावे लागणार आहे.**

रोजगार बुडाला आहे.

उड्डाणपुलाचे पिल्लर उभारण्याचे काम पूर्ण झाले असून, त्यावर गर्डर टाकण्याची प्रक्रिया सुरू आहे. गर्डर तयार करण्याचे काम नागपूर येथे सुरू असून, हे काम लवकरच पूर्ण होणार आहे. फेब्रुवारी २०२७मध्ये उड्डाणपुलाचे बांधकाम पूर्ण केले जाईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रामटेके यांनी सांगितले.

# गांजा, ड्रग्स माफियांचा बंदोबस्त करा;जिल्हा काँग्रेस कमेटीचे पोलिस उपअधिक्षकांना निवेदन



**गोंदिया :–** मागील काही दिवसांपूर्वी पोलिसांनी रेल्वे गाड्यांसह चारचाकी वाहनांने गांजाची तस्करी करणाऱ्यांवर कारवाई केली. या कारवाई लोखाचा मुद्देमालही जप्त करण्यात आला. मात्र शहरासह जिल्ह्यात गांजा व ड्रग्स माफियांचे जाळे पसरतच चालल्याने कारवाई करून सुद्धा तस्कर गब्बर झाले आहे. परिणामी अल्पवयीन मुले, युवक गांजा व ड्रग्सच्या आहारी गेले आहेत. तेव्हा या गांजा, ड्रग्स सारख्या अमली पदार्थांची विक्री व माफियांवर आळा घालण्यात यावा, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमेटीच्या वतीने करण्यात आली आहे. तसेच पोलीस उपधीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आले.

मागील अनेक दिवसांपासून गोंदिया शहरांमध्ये विशेष करून शाळा महाविद्यालय आणि खाजगी कोचिंगमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये ड्रग्सचे व्यसन लागल्याचे अनेक तक्रारी प्राप्त होत आहेत. ग्रामीण भागातील पालक आपल्या पाल्यांना उच्च शिक्षणासाठी शहरात पाठवितात मात्र हे युवक आता ड्रग्स सारख्या अमली पदार्थ्यांच्या आहारी जावू लागल्या आहेत. बरेच पालक आपल्या मुलांना भाड्याची खोली किंवा वस्तीगृहामध्ये राहायला लावून शिक्षण घेण्याची व्यवस्था करून देतात. मुलेएकटे असल्यामुळे बऱ्याच ठिकाणी व्यसनाधीन होत असल्याचे तक्रारी मागील अनेक दिवसांपासून गोंदिया शहरांमध्ये वाढलेली आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी शेतमजूर कुटुंबातील पालक वर्ग आपल्या मुलांना अतिशय काबाड कष्टाने कमावलेला पैसा आपल्या मुलांच्या शिक्षणावर खर्च करतात. परंतु या मुलांना व्यसनाधीन करण्याचे कार्य शहरात वावरणारे ड्रग्स माफिया करत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेष करून शाळा महाविद्यालय, खाजगी कोचिंग, खाजगी वस्तीगृह च्या परिसरात या ड्रग्स माफियांचा धंदा जोरात चालू असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. परंतु याबाबतीत पोलीस प्रशासन मात्र गप्प आहे त्यामुळेड्रग्ज माफीयांचा धंदा जोरात चालू आहे. याच्यामध्ये संपूर्ण कुटुंबाचा उज्वल भविष्य असलेले पोर उध्वस्त होत आ–हेत. या ड्रग्स माफियांना वेळीच आवर घालणं आवश्यकआहे. याबाबतीत आज जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अमर वराडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. या ड्रग्स माफियांवर वेळीच कार्यवाही करून आवर घातला नाही तर गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीच्या माध्यमाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सुद्धा देण्यात आला.यावेळी पी.जी.कटरे, राजकुमार पुराम, विशाल अग्रवाल, एड.दुष्यंत किरसाण, शहर काँग्रेसचे अध्यक्ष अशोक चौधरी, जितेंद्र कटरे, डेमेंद्र, रहांगडाले, जमील भाई पठाण, झहीर भाई अहमद, बाबा मिश्रा, महेश उके, अमन तिघाला जगदीश चुटे, बलजीत सिंग बग्गा, शैलेश बाहेकर, रंजीत गणवीर, जीवन शरणागत, कुणाल शेंडे आणि इतर पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# अदानी पॉवर लि.तिरोडा येथे वाहनचालकांकरीता रस्ता सुरक्षा जनजागृती कार्यक्रम



**तिरोडाः–** रस्ता सुरक्षा वाढविणे व अपघात कसे टाळायचे या उद्देशाने अदानी पॉवर लिमिटेड, तिरोडाच्या वतीने (दि.२६) कंपनीच्या मटेरियल गेट येथे सर्व वाहनचालकांसाठी रोड सेफ्टी टूल बॉक्स टॉक (ढइढ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.हा कार्यक्रम तिरोडा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अमित वानखेडे यांच्या समन्वयाने पार पडला.

कार्यक्रमादरम्यान वाहनचालकांना सुरक्षित व जबाबदार वाहनचालनेबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. वाहन चालविताना मद्य, गांजा किंवा कोणत्याही प्रकारच्या अमली अथवा प्रतिबंधित पदार्थांचे सेवन करून वाहन चालवू नये, निर्धारित वेगमर्यादेचे पालन करावे तसेच अतिवेगाने वाहन चालविणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले.

यासोबतच वाहनामध्ये रिफ्लेक्टिव्ह कोन, बॅरिकेड टेप आणि वॉर्निंग ट्रँगल (थरीपळपस ढीळरपसश्रश) यांसारखी आवश्यक रस्ता सुरक्षा साधने ठेवण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले. वाहनाचा नोंदणी क्रमांक (नंबर प्लेट) स्पष्ट व सहज दिसेल असा असावा, तसेच अपघात किंवा हिट अँड रन सारखी घटना घडल्यास तात्काळ पोलिसांना माहिती देण्याबाबत जनजागृती करण्यात आली.सर्व जड वाहनचालकांनी रिफ्लेक्टिव्ह जॅकेट जवळ ठेवणे अनिवार्य असल्याचे सांगण्यात आले. वाहन बंद पडल्यास किंवा आपत्कालीन परिस्थितीत चालकाची दृश्यता वाढून अपघात टाळण्यास त्याचा महत्त्वपूर्ण उपयोग होतो, असेही स्पष्ट करण्यात आले.

यावेळी रस्ता सुरक्षा ही प्रत्येक वाहनचालकाची सामूहिक जबाबदारी आहे, असा संदेश देत सर्वांनी वाह–तूक नियमांचे काटेकोर पालन करून सुरक्षित वाहनचालनेची सवय अंगीकारावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश वाहनचालकांमध्ये रस्ता सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे, सुरक्षित वाहनचालनेला प्रोत्साहन देणे आणि रस्ते अपघातांची संख्या कमी करण्यासाठी जनजागृती करणे हा होता.

# बोदलकसा कालवा नूतनीकरणाला प्रारंभ

**तिरोडा:**–विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या धापेवाडा उपसा सिंचन योजना टप्पा–२ अंतर्गत बोदलकसा उजव्या कालव्याचे नूतनीकरण कामाचे भूमिपूजन तिरोडा तालुक्यात रविवारी आ. विजय रहांगडाले यांच्या हस्ते पार पडले.



कार्यक्रमाला प्रमुख प्रमुख अतिथी म्हणून पंचायत समिती सभापती तेजराम चव्हाण, जि.प. सदस्य प्रवीण पटले, जि.प. सदस्य बालूभाऊ बावनथडे, सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती जितेंद्र रहांगडाले, उपसभापती पं.स. सुनंदाबाई पटले, पं.स. सदस्य ज्योती शरणागत, सरपंच जयश्री गुन्हेरिया, सरपंच अनिता धुर्वे, सरपंच संजय कोटांगले यांच्यासह इतर मान्यवर व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. रहांगडाले म्हणाले की, बोदल कसा उजव्या कालव्याचे नूतनीकरण बारा ते वीस पॉइट ८ किमी २२.२५ कोटी निधीचे काम आहे. या महत्त्वपूर्ण सिंचन कामामुळे तिरोडा–गोरेगांव मतदारसंघातील शेतकऱ्यांना सक्षम सिंचन व्यवस्था मिळेल. उत्पादनवाढ होऊन ग्रामीण विकासाला गती मिळेल. असा आशावाद व्यक्त केला. या कामामुळे हजारो हेक्टर शेतीला थेट फायदा होणार असून पाण्याची गळती थांबून शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहोचणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कृषी विभागाकडून जिल्हा व तालुकानिहाय ऑनलाईन माहिती जाहीर

**नागपूर :** खरीपाच्या चालु हंगामात शेतकऱ्यांसाठी पुरेशा प्रमाणात रासायनिक खतांची उपलब्धता राहील, या दृष्टीने कृषी विभागाकडून प्रयत्न करण्यात आले आहेत. यासंदर्भात कृषी विभागाने आपल्या संकेतस्थळावर रासायनिक खतांच्या उपलब्धतेची अद्ययावत जिल्हा, तालुका आणि केंद्रनिहाय आकडेवारी उपलब्ध केली आहे. नागपूर विभागात शेतकऱ्यांसाठी पुरेशा प्रमाणात खतांचे साठे उपलब्ध आहेत.

कृषी विभागाच्या माहितीनुसार गोंदिया जिल्ह्यासाठी सुमारे २० हजार ४६८ मेट्रिक टन विविध रासायनिक खतांचा साठा उप–लब्ध (सुमारे १ हजार ९०० केंद्र) असल्याची माहिती देण्यात आली आहे. भंडारा जिल्हा परिषदेच्या कृषी विभागानुसार जिल्ह्यासाठी खतांच्या १ लाख १ हजार २५७ बॅग उपलब्ध आहेत. विभागाने त्यासाठी २८५ कृषी सेवा केंद्रांची माहितीही उपलब्ध करून दिली आहे. चंद्रपूर जिल्ह्यासाठी विविध रासायनिक खतांच्या ८ लाख ९ हजार ६१३ बॅग उपलब्ध आहेत. कृषी विभागाने जिल्ह्यातील २३९० कृषी केंद्रांची माहितीही दिली आहे.शेतकऱ्यांना खतांच्या उपलब्धतेबाबत माहिती जाणून घेण्यासाठी थेट कृषी सेवा केंद्रांशीही संपर्क साधता येणार आहे. यासंदर्भात अडचणी असल्यास स्थानिक कृषी अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# तलाव खोलीकरणाच्या नावावर कंत्राटदारांचा मालसुतो

**अर्जुनी–मोरगाव :** – जलसंधारण, भूजलपातळी वाढ आणि तलावांचे संवर्धन या उद्देशाने शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून तलाव खोलीकरणाची कामे केली जात आहेत. मात्र अर्जुनी–मोर तालुक्यात सुरू असलेल्या काही तलाव खोलीकरणाच्या कामांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, या योजनांचा लाभ जनतेपेक्षा ठेकेदार आणि संबंधित घटकांनाच अधिक होत असल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. खोलीकरणातून निघालेला मुरुमाची परस्पर विल्हेवाट ला–वून ठेकेदार डबल कमाई करीत असल्याची चर्चा आहे. यावर कुणाचेही नियंत्रण नसल्याने मअर्थे तुमचे अर्धे आमचेफ या धर्तीवर यंत्रणा व कंत्राटदार अग्रेसर असल्याचे बोलले जात आहे.

तालुक्यात लघुपाटबंधारे विभागाचे सुमारे २६३ तर विविध विभागांचे मिळून जवळपास ३५० तलाव आहेत. सध्या अनेक तलावांमध्ये खोलीकरणाची कामे सुरू आहेत. तलावातील

गाळ शेतकऱ्यांच्या शेतात पोहोचवणे आणि तलावांची साठवण क्षमता वाढवणे हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. मात्र प्रत्यक्षात तलावातून निघण–ारा मुरुम आणि माती खासगी प्लॉट, घरांच्या भरावासाठी तसेच विविधपांदण रस्त्यांवर वापरली जात असल्याचे आरोप होत आहेत.

तलावातून निघणारा मुरुम ट्रॅक्टरद्वारे नेऊन काही ठिकाणी ३०० ते ४०० रुपये प्रति ब्रास दराने विक्री केली जात असल्याची चर्चा आहे. त्यामुळे एका बाजूला शासनाकडून

खोलीकरणासाठी निधी मिळत असताना दुसऱ्या बाजूला त्याच कामातून निघणाऱ्या मुरुम ाच्या विक्रीतून अतिरिक्त आर्थिक लाभकंत्राटदार व अधिकाऱ्यांना होत असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे गाळ उपसा मोहिम कंत्राटदारांसाठी मडबल कमाईफचे साधन ठरत असल्याचे दिसून



येत आहे. या सर्वप्रकरणामुळे तलाव खोलीकरणाच्या कामांची गुणवत्ता, मुरुमाच्या वापराची नोंद, महसूल विभागाची भूमिका आणि शासनाच्या निधीचा उपयोग याबाबत प्रश्न निर्माण झाले आहेत. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

**पांदण रस्त्यांवरही प्रश्नचिन्ह**

तालुक्यात मंजूर असलेल्या अनेक पांदण रस्त्यांमध्ये तल–ावातील मुरुमाचा वापर होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. जर रस्ते बांधकामासाठी आवश्यक साहित्य तलाव खोलीकरणातूनच उपलब्ध होत असेल, तर रोजगार हमी व इतर योजनांमधील मजुरांच्या रोजगारावर परिणाम होत असल्याचेही मत व्यक्त केले जात आहे.

काही अधिकाऱ्यांशी संगनमत करून एका योजनेचे साहित्य दुसऱ्या योजनेत वापरून शास–नाची दिशाभूल केली जात आहे. तर दुसरीकडे मंजूर निधीची परस्पर विल्हेवाट लावून आपले खिसे गरम करीत आहे.

# गोंदिया जिल्ह्यात ३२ सारस पक्ष्यांची नोंद

**गोंदिया :–**२०२६ च्या वार्षिक सारस पक्षी गणनेनुसार गोंदिया जिल्ह्यातील ५३ सारस अधिवास क्षेत्रापैकी १५ अधिवास क्षेत्रात ३२ सारस पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे.तर शेजारील भंडारा जिल्ह्यांमध्ये सारस गणणेचे काम सुरु आहे.सोबतच मध्यप्रदेशातील बालाघाट जिल्ह्यात ५० सारस पक्ष्यांची नोंद करण्यात आली आहे. २० जून रोजी गोंदिया व बाला–घाट वनविभाग व सेवा संस्थानसह जिल्ह्यातील विविध अशासकीय संस्थेच्या संयुक्त विद्यमाने सारस पक्षी प्रगणनेचे आयोजन करण्यात आले होते.

बाघ व वैनगंगा नद्या महाराष्ट्र व मध्यप्रदेशातील अनुक्रमे गोंदिया व बालाघाट जिल्ह्यांना विभागणाऱ्या प्रमुख नद्या आहेत. भौगोलिकदृष्ट्या या नद्यांच्या दोन्ही तीरांवरील परिसरांमध्ये समान हवामान, जमीन प्रकार आणि शेती पद्धतीमुळे जैवविविधतेत अनेक साम्ये आढळतात. या परिसंस्थात्मक साम्यामुळे काही सारस पक्ष्यांचे जोडपे अधिवास आणि अन्नसंधानासाठी या दोन्ही प्रदेशांमध्ये मुक्तपणे संचार करताना आढळतात. यामध्ये विशेषतः प्रजनन काळात किंवा विश्रांतीसाठी दोन्ही बाजूंच्या शेतक्षेत्रांचा वापर होत असल्याचे निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे.न्यायालयाच्या निर्देशानंतर गोंदिया व भंडारा जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष देण्यास सुरवात केली आहे.

गोंदिया जिल्ह्या–तील सारस पक्ष्यांचे अधिवास असलेल्या गोंदिया, तिरोडा व आमगाव तालुक्यांतर्गत एकूण ५३ वेगवेगळ्या ठिकाणी जिल्ह्यातील अशासकीय स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी व गोंदिया वनविभागाचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही गणना सकाळी ४.४५ ते ० वाजेपर्यंत केलेली असून सारस पक्षी प्रगणनेमध्ये



एकूण ३२ सारस पक्ष्यांची नोंद झालेली आहे.सारस पक्ष्यांची प्रगणना करण्यासाठी चमू तयार करण्यात आले होते. प्रत्येक चम ूमध्ये स्वयंसेवी संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, स्थानिक प्रतिनिधी/शेतकरी, वन विभागातील वनपाल, वनरक्षक असे एकूण २ ते ४ व्यक्ती असे १४०–१५० सदस्यांनी या नोंदणीत सहभाग घेतला.सारस पक्षी प्रगणनेकरीता गोंदिया जिल्ह्यातील सेवा संस्था व इतर अशासकीय संस्थेचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी तसेच गोंदिया,भंडारा व बाला–घाट वनविभागातील कर्मचाऱ्यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवून सारस पक्ष्यांचे अधिवास असलेले पाणथळ जागा, नद्या, शेतांमध्ये, तलावांजवळ जाऊन पाहणी करुन सारस पक्ष्यांची प्रगणना केली.

सदर सारस पक्षी गणना पवन जोंग, उपवनसंरक्षक गोंदिया वनविभाग, सावन बहेकार अध्यक्ष सेवा संस्था गोंदिया यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.सदर गणनेत गोंदिया जिल्ह्याचे जिल्हाधिकारी मंगेश गोंदावले यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच सहाय्यक वनसंरक्षक (तेंदू व कॅम्प),सहाय्यक वनसंरक्षक (रोपे व वन्यजीव),वनपरिक्षेत्र अधिकारी गोंदिया व आमगाव तसेच सेवा संस्थेचे शशांक लाडेकर,कन्हैया उदापुरे, अभिजित परिहार,डीलेश कुसराम,सुशील बहेकार,भास्कर कापसे,मुकुंद धुर्वे (इछकड), वनविभागातील वनकर्मचारी व जिल्ह्यातील अशासकीय स्वयंसेवी संस्थांचे स्वयंसेवक, सारस मित्र, शेतकरी यांचे सहकार्य लाभले. सारस पक्षी गणना दरम्यान दोन दिवस नदी घाट परिसरात (सारस पक्षी विश्रांती स्थळांजवळ) मानवी हालचालींवर मर्यादा घालण्याची विनंती जिल्हा पोलिस अधीक्षक गोंदिया यांना करण्यात आली होती.

# गोंदिया जिल्हा नागरी-ग्रामीण पतसंस्था संघाच्या अध्यक्षपदी सुभाष आकरे

## उपाध्यक्षपदी किशोर डोंगरवार, सचिवपदी संतोष बिसेन यांची बिनविरोध निवड

**गोंदिया :–** गोंदिया जिल्हा नागरी/ग्रामीण बिगर शेती व कर्मचारी सहकारी पतसंस्थांचा संघ मर्या., गोंदिया (रजि. क्र. २) च्या सन २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी नवनियुक्त संचालक मंडळाची पहिली सभा मंगळवारी गणेशनगर येथील गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी अध्यक्ष, उपाध्यक्ष व सचिव पदांची निवड बिनविरोध करण्यात आली.

निवडणूक निर्णय अधिकारी विशाल वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत अध्यक्षपदी सुभाष गोविंदराव आकरे, उपाध्यक्षपदी किशोर बाबा डोंगरवार तर सचिवपदी संतोष रेखचंद बिसेन यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. सर्व पदांसाठी एकमेव नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाल्याने



निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांची निवड घोषित केली.अध्यक्षपदासाठी सुभाष आकरे यांचे नाव सुमेश चैतराम कटरे यांनी सुचविले असून उमेश हिरालालजी यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्षपदासाठी किशोर डोंगरवार यांचे नाव जयंत रघुनाथजी लांजेवार यांनी सुचविले तर सुखचंद पांडुरंग राऊत यांनी अनुमोदन दिले. सचिवपदासाठी संतोष बिसेन यांचे नाव गजानन रामदासजी चंदीवाले यांनी सुचविले व खुमेश चैतराम कटरे यांनी अनुमोदन दिले. सभेला किशोर डोंगरवार, उमेश हिरालालजी, खुमेश कटरे, संतोष बिसेन, जयंत लांजेवार, मीना बिसेन, सुभाष आकरे, सुखचंद राऊत, महेश अहिरकर, गजानन चंदीवाले, सामाजिक कार्यकर्ते यशवंत मानकर आदी संचालक उपस्थित होते.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करताना निवडणूक निर्णय अधिकारी विशाल वंजारी यांनी संघाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. नव्या संचालक मंडळाच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण पतसंस्थांच्या विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

# माजी आमदार मारहाण प्रकरण, भाजप नगरसेवकास पाच वर्षांची शिक्षा

## तब्बल १० वर्षांनंतर लागला निकाल : जिल्हा सत्र न्यायालयाचा निर्णय

**गोंदिया :-** शहरातील कुडवा परिसरातील हॉटेल ग्रँडसीता येथे माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांना झालेल्या मारहाण प्रकरणी निर्णय देताना जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. प्रतिनिधी यांनी भाजप नगर-सेवक शिवकुमार शंकरलाल शर्मा आणि राहुल हेमराज श्रीवास या दोघांना अनुक्रमे ५ वर्षांची शिक्षा व ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तर याच प्रकरणात इतर ४ आरोपींची निर्दोष मुक्तता केली. ही सुनावणी गुरुवारी (दि.२५) करण्यात आली.

माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी ९ एप्रिल २०१६ रोजी कुडवा येथील हॉटेल ग्रँडसीता येथे कॉंग्रेस पक्षातर्फे पत्रकार परिषद घेत होते. या सभेत नगरसेवक शिव शर्मा आणि राहुल श्रीवास यांनी येऊन माजी आमदार गोपालदास अग्रवाल, त्यांचे पुत्र विशाल अग्रवाल व इतर लोकांना मारहाण करून पळ काढला होता. या घटनेची तक्रार रामनगर पोलिस ठाण्यात करण्यात आली होती.

याप्रकरणी शिव शर्मा यांच्यासह ६ जणांविरुद्ध भादंवि कलम ३०७, १२० (ब), ३२४, ३२५, २९४, ५०५, २१२ व ३४ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणाचा तपास रामनगर पोलिस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार ताईतवाले यांनी केला होता. त्यानंतर तत्कालीन पोलिस निरीक्षक नन्नावरे यांनी संपूर्ण प्रकरणाचा तपास करून दोषारोपत्र न्यायालयात दाखल केले होते. या प्रकरणाची मागील ५ दिवसांपासून न्यायालयात सुनावणी सुरू होती. माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी आरोपींना अटकपूर्व जामीन मिळू नये म्हणून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात अर्ज दाखल केला होता.

त्यामुळे आरोपी शिव शर्मा यांना शेवटी जामीन मिळाला नव्हता. कोरोनामुळे सर्वोच्च न्यायालयातही कोणतीही सुनावणी झाली नाही. त्यामुळे शिव शर्मा यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालयात उपस्थित राहून स्वतःला अटक करून घेतले होते. माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांनी या प्रकरणात शासनाकडे मागणी करून तज्ज्ञ अ‍ॅड. पी. के. सत्यनाथन यांची नियुक्ती केली होती. त्यांनी वे-ळोवेळी न्यायालयात उपस्थित राहून या प्रकरणात सरकारी वकील म्हणून युक्तीवाद केला. यात सरकारी वकील पुरुषोत्तम आगाशे यांनी सुध्दा सहकार्य केले. जिल्हा न्यायाधीश १ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए. एस. प्रतिनिधी यांनी २५ जून रोजी दुपारी ४ वाजता प्रकरणाची सुनावणी सुरू केली. यावेळी अ‍ॅड. सत्यनाथन हे नागपूर येथून आभासी पद्धतीने उपस्थित होते. आरोपीचे वकील प्रकाश तोलानी हे न्यायाधीश परीक्षेसाठी मुंबईला गेले होते. त्यामुळे त्यांच्या सहकारी वकिलांनी न्यायाधीशांकडे आरोपीची शिक्षा कमी करण्यासाठी युक्तीवाद केला.



### चार आरोपींची निर्दोष मुक्तता

**जिल्हा न्यायाधीश १ ए. एस. प्रतिनिधी यांनी शिव शर्मा आणि राहुल श्रीवास यांना अनुक्रमे ५ वर्षे कारावास व अनुक्रमे ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच अनिमेष उर्फ राज लक्ष्मीनारायण दुबे, गजेंद्र रामचरण सते, परवेज पटेल परवेज खान आणि जगजितसिंग उर्फ बिट्टू प्रितमसिंग भाटिया यांना या प्रकरणात निर्दोष मुक्त केले. या प्रकरणाच्या सुनावणीच्या वेळी न्यायालयात बरेच लोक उपस्थित होते.**

### आरोपींना घेतले पोलिसांनी ताब्यात

**शिक्षा सुनावणी पूर्ण होताच न्यायालय परिसरात उपस्थित पोलिस कमचाऱ्यांनी शिव शर्मा आणि राहुल श्रीवास या दोघांना आपल्या ताब्यात घेतले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आरोग्य तपासणी केल्यानंतर दोघांची उशिरा रात्री भंडारा कारागृहात रवानगी करण्यात आली.**

# चार महिन्याच्या दहशतीनंतर अखेर लंगडी 'टी-२७' जेरबंद!

**गोंदिया:-**दोघांचा बळी घेत, दोघांना गंभीर जखमी करुन साकोली आणि लाखनी तालुक्यासह नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पालगतच्या गावांमध्ये गेल्या चार महिन्यांपासून भीतीचे सावट निर्माण करणाऱ्या मटी-२७फ या लंगड्या वाघिणीला अखेर रविवारी २८ रोजी उमरझरी परिसरातील जंगलातून जेरबंद करण्यात वनविभागाला यश आले.तीन महिन्यांहून अधिक काळ सुरू असलेल्या या आव्ह-ानात्मक मोहिमेचा अखेर यशस्वी शेवट झाला असून परिसरातील नागरिकांनीही सुटकेचा निश्वास सोडला आहे.

नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया व भंडारा वनविभागाच्या रॅपिड रिस्पॉन्स टीम (ठठढ) तसेच एफडीसीएमच्या वनकर्मचाऱ्यांनी संयुक्तरीत्या हे धाडसी ऑपरेशन पार पाडले. अनेक वेळा वनविभागाच्या हाती लागूनही चकवा देणाऱ्या या वाघिणीला पकडण्यासाठी शेकडो वनकर्मचारी, तज्ज्ञ आणि अधिकारी दिवस-रात्र प्रयत्नशील होते.



मार्च महिन्यात या वाघिणीने अवघ्या १९ दिवसांत तीन हल्ले करून परिसरात दहशत निर्माण केली होती. १९ मार्च रोजी बांपेवाडा येथील वसंत मेश्राम यांचा मोहफुले वेचताना या वाघिणीच्या हल्लयात हल्लयात मृत्यू झाला. त्यानंतर २७ मार्च रोजी उमरझरी येथील माया सोनवणे यांच्यावर दबा धरून बसलेल्या या वाघिणीने हल्ला चढवला. गंभीर जखमी झालेल्या माया सोनवणे यांचा नागपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. आमगाव येथील छाया मुंगमोडे या महिला देखील वाघिणीच्या हल्लयात गंभीर जखमी झाल्या होत्या.दरम्यान, २४ जून रोजी आमगाव येथील हरिश्चंद्र मडावी यांच्यावर पुन्हा हल्ला करून वाघिणीने त्यांचा बळी घेतला.

या घटनेनंतर नागरिकांचा संताप अनावर झाला होता. शेतकरी, मजूर आणि वनक्षेत्रा-लगत राहणाऱ्या नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते. सकाळ-संध्याकाळ घराबाहेर पडतानाही भीतीचे वातावरण निमर्ण झाले होते. वनविभागाने अनेक ठिकाणी पिंजरे, कॅमेरे, ट्रॅप यंत्रणा आणि विशेष पथके तैनात केली होती. मात्र जखमी अवस्थेतील ही वाघीण अत्यंत सावधपणे हालचाली करत असल्याने ती पकडण्यास विलंब होत होता.

रविवारी सकाळी उमरझरी परिसरातील उसाच्या शेतात एका शेळीची शिकार केल्यानंतर वाघीण त्या परिसरात असल्याची माहिती वनविभागाला मिळाली. त्यानंतर तातडीने राबविण्यात आलेल्या कारवाईत तिला यशस्वीरीत्या जेरबंद करण्यात आले. सध्या तिच्या वैद्यकीय तपासणी व पुढील पुनर्वसनाची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सहाय्यक वनसंरक्षक (अउत्र) सुहास कांबळे यांनी दिली. गेल्या चार महिन्यांपासून भीतीचे प्रतीक ठरलेली मटी-२७फ अखेर जेरबंद झाल्याने साकोली तालुक्यासह संपूर्ण परिसराने सुटकेचा श्वास घेतला आहे.

# धावत्या दुरान्तोत सुरक्षित प्रसूती; गोंदियाच्या आरोग्यसेविकेच्या धाडसाने आई-बाळ सुखरूप

**गोंदिया :-** नागपूरहून मुंबईकडे जाणाऱ्या दुरान्तो एक्सप्रेसमध्ये एका गर्भवती मातेला अचानक तीव्र प्रसुती कळा येऊ लागल्या. पुढील स्टेशन येण्यास बराच वेळ असल्याने निर्माण झालेल्या अत्यंत गंभीर परिस्थितीत गोंदिया येथील आरोग्यसेविका राजश्री भोंडे (नेवारे) यांनी स्वतःची जबाबदारी ओळखून धोका पत्करत धावत्या ट्रेनमध्येच महिलेची सुरक्षित प्रसुती केली. त्यांच्या या धाडसामुळे आणि तत्परतेमुळे माता व नवजात बाळ दोघेही सुखरूप आहेत.

प्राप्त माहितीनुसार २४ जून रोजी सकाळी नागपूर मुंबई दुरान्तो एक्सप्रेस जळगाव स्टेशनच्या पुढे जात असताना, ट्रेनमधील एका गरोदर महिला प्रवाशाला अचानक तीव्र प्रसव कळा व वेदना सुरू झाल्या. पुढील स्टेशन येण्यासाठी बराच कालावधी शिल्लक असल्याने ट्रेनमधील प्रवासी आणि ना-तेवाइक प्रचंड घाबरले होते. याच ट्रेनमधून प्रवास करीत असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, काटी अंतर्गत उपकेंद्र, मरारटोला येथे कार्यरत असणाऱ्या आरोग्यसेविका राजश्री भोंडे (नेवारे) यांनी कोणतीही भीती न बाळगता तत्काळ पुढाकार घेतला. धावत्या ट्रेनमध्ये प्रसुतीसाठी लागणारी पुरेशी वैद्यकीय साधने उपलब्ध नसतानाही, भोंडे सिस्टर यांनी वेळेचे गांभीर्य ओळखले. कोणतीही वैद्यकीय गुंतागुंत होऊ न देता, आपल्या प्रदीर्घ अनुभवाच्या बळावर त्यांनी धावत्या ट्रेनमध्येच महिलेची यशस्वी प्रसुती केली. महिलेने एका गोंडस बाळाला सुखरूप या जगात आणले आणि पुढील मोठा अनर्थ टाळला.

**चाळीसगाव स्टेशनवर मिळाली पुढील मदत**

प्रसुती सुखरूप झाल्यानंतर ट्रेन चाळीसगाव रेल्वे स्टेशनवर थांबवून तेथे आधीच सज्ज ठेवलेल्या रुग्णवाहिकेच्या मदतीने माता आणि बाळाला पुढील वैद्यकीय उपचारासाठी रुग्णालयात रेफर करण्यात आले.

**आरोग्य विभागाकडून कौतुकाचा वर्षाव**

आरोग्यसेविका राजश्री भोंडे



यांनी जनसेवेचा आणि आपल्या कर्तव्याचा एक अनोखा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांच्या या उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्याबद्दल गोंदियाचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजीत गोल्हार, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अरविंदकुमार वाघमारे आणि माता बाल संगोपन अधिकारी डॉ. रोशन राऊत यांनी त्यांचे विशेष कौतुक केले आहे. राजश्री भोंडे यांना वेळीच दाखविलेल्या प्रसंगावधानबद्दल गोंदिया जिल्हा आरोग्य विभागातर्फे गौरवान्वित करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# २.८० कोटी लीटरने वाढली पाणी साठवणूक क्षमता !

**नवेगावबांध:-** नवेगावबांध येथील निहासिक जलाशयात लोकसहभाग णि प्रशासकीय इच्छाशक्तीच्या जोरावर नवा आणि आदर्श पॅटर्न निर्माण झाला हे. स्थानिक नागरिक, शेतकरी आणि बटर-जेसीबी मालकांच्या स्वखर्चातून व फूर्त लोकसहभागातून गेल्या अवघ्या हा दिवसांत झालेल्या धडाकेबाज गाळ सामुळे यंदा नवेगाव जलाशयाची पाणी ठवण क्षमता तब्बल १५.५७ दशलक्ष टरने (१.५५ कोटी लीटर) वाढली आहे.

मागील वर्षीचा जलसाठा आणि या वर्षीची कामगिरी मिळून आतापर्यंत एकूण २ कोटी

लाख लीटर वाढीव पाणी साठवणूक क्षमता निर्माण झाली आहे. या यशस्वी चळवळीचे मुख्य सूत्रधार जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी समीर बनसोडे यांच्यावर सध्या सर्वस्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

शासन स्तरावर कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करूनही अनेकदा जलसंधारणाची कामे वेळेत पूर्ण होत नाहीत किंवा अपेक्षित उद्दिष्ट साध्य होत नाही, असा आजवरचा सार्वत्रिक अनुभव आहे. मात्र, याला पूर्णपणे छेद देत अचूक नियोजनातून नवा अध्याय लिहला जात आहे. नवेगाव जलाशयाच्या खोलीकरणासाठी आणि गाळ उपशासाठी मगाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवारफ अभियानांतर्गत विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती, ज्याचे अत्यंत सकारात्मक परिणाम समोर आले आहेत. जलसंपदा विभागाचे उपविभागीय अधिकारी समीर बनसोडे यांनी





केवळ शासकीय मंजुरी आणि नियमांचे कागदी घोडे न नाचवता स्थानिक पातळीवर शेतकरी आणि वाहन धारकांना विश्वासात घेतले. जलाशयातील सुपीक गाळशेतकऱ्यांनी स्वखर्चाने आपल्या शेतात वाहून नेल्यामुळे धरणाचे नैसर्गिकरित्या खोलीकरण तर झालेच, शिवाय शेतकऱ्यांच्या जमिनीची सुपीकताही वाढली. एकीकडे कोट्यवधींचा शासकीय निधी खर्च करून जे सिंचनाचे लक्ष साध्य होत नाही, ते लोकसहभागाच्या माध्यमातून अवघ्या काही दिवसांत पूर्ण करून बनसोडे यांनी प्रशास-नासमोर एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.

**सिंचन आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार**

या वाढीव जलसाठ्यामुळे नवेगावबांध परिसरातील भूजल पातळीत कमालीची वाढ होणार आहे. ऐन उन्हाळ्यात विहिरी आणि कूपनलिका कोरड्या पडण्याच्या समस्येपासून ग्रामस्थांची कायमची सुटका होणार असून, रब्बी आणि खरीप हंगामातील पिकांना हक्काचे सिंचन उपलब्ध होणार आहे. शासकीय निधीची वाट न पाहता लोकसहभागातून इतका मोठा प्रकल्प यशस्वी होऊ शकतो, हे नवेगावबांधच्या जनतेने आणि जलसंपदा विभागाने दाखवून दिले आहे.

**मागील वर्षीची कामगिरी**

लोकसहभागाच्या पहिल्या टप्प्यात मागील वर्षी १. २५ कोटी लीटर (१२.५ दशलक्ष लीटर) पाणी साठवण क्षमता वाढली होती. यावर्षी अवघ्या ६ दिवसांत शेतकऱ्यांनी आणि ट्रॅक्टर धारकांनी स्वतःच्या खर्चाने तब्बल ५,५०० ब्रास गाळ उपसून नेला. ज्यामुळे या वर्षी १५.५७ दशलक्ष लीटर (१.५५ कोटी लीटर) अतिरिक्त जलसाठा निर्माण झाला आहे. दोन वर्षातील हा आकडा एकत्र केल्यास आता या जलाशयात २ कोटी ८० लाख लीटरपेक्षा जास्त पाणी अतिरिक्त साठवून ठेवता येणार आहे.

## राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा

**गोंदिया** : योग्य नियोजन, प्रभावी निर्णय आणि नागरिकांच्या सर्वंकष विकासासाठी अचुक आकडेवारी महत्वाची असते, असे प्रतिपादन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपायुक्त सुनिल धोंगडे यांनी केले.येथील जिल्हा सांख्यिकी कार्यालयात सोमवारी २० वा ङ्कराष्ट्रीय सांख्यिकी दिनफ साजरा करण्यात आला, त्यावेळी ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रभारी जिल्हा नियोजन अधिकारी डॉ.रुपेश राऊत, जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे-निमसरकर, एनएमडी महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा.अलका पाटील उपस्थित होत्या. उपायुक्त श्री. धोंगडे म्हणाले, भारतीय सांख्यिकी क्षेत्रातील शास्त्रज्ञ आणि सांख्यिकीचे जनक प्रा. प्रशांत चंद्र महालनोबिस यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २९ जून रोजी "राष्ट्रीय सांख्यिकी दिन' साजरा केला जातो.


## खासदार राजेंद्र जैन यांचा शपथविधी

**गोंदियाः-** आज दिल्ली येथे संसदेच्या वरिष्ठ सभागृह असलेल्या राज्यसभेत नवनिर्वाचित राज्यसभा सदस्य (खासदार) राजेंद्र जैन यांनी पद आणि गोपनीयतेची शपथ घेत संसदीय कारकिर्दीची अधिकृत सुरुवात केली.

राज्यसभेचे सभापती तथा भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते खासदार राजेंद्र जैन यांना पद आणि गोपनीयतेची शपथ देण्यात आली. या ऐतिहासिक क्षणानंतर राजेंद्र जैन यांनी देशहित, संविधानातील मूल्ये आणि जनतेच्या अपेक्षांप्रती निष्ठा राखून कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. निवडीबद्दल देशाचे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार प्रफुल पटेल, खासदार सुनील तटकरे, नामदार छगन भुजबळ, खासदार पार्थ पवार,दिलीप वळसे पाटील



व राज्यातील सर्व आमदार महोदय यांचे आभार मानले. तसेच भंडारा-गोंदिया जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विकासाशी निगडित प्रश्न राज्यसभेत प्रभावीपणे मांडून जनतेच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.



# सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात शाहू महाराजांनी अभूतपूर्व क्रांती घडविली-अपर जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे

## सामाजिक न्याय विभागातर्फे सामाजिक न्याय दिन साजरा

**गोंदिया,:-** सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी अभूतपूर्व क्रांती घडवून समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले, असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी अभिजित घोरपडे यांनी केले. त्यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक न्याय दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती सामाजिक न्याय विभागाच्या समाज कल्याण कार्यालय गोंदियाच्या वतीने सामाजिक न्याय दिन म्हणून सामाजिक न्याय भवनात साजरी करण्यात आली. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त समाज कल्याण उपायुक्त अनिल देशमुख, शुध्दोधन सहारे, सविता बेदरकर, समाज कल्याण सहायक आयुक्त किशोर भोयर, समाज कल्याण अधिकारी किर्तीकुमार कटरे व समाजभुषण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.



श्री. घोरपडे म्हणाले, राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म २६ जून १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. शाहू महाराज हे कृतीशील राजे होते. त्यांनी बहुजन समाजाच्या उद्?दारासाठी आणि समतेसाठी अनेक कार्ये केली. त्यांना बहुजनांच्या शिक्षणाविषयी खुप तळमळ होती, म्हणून त्यांनी कोल्हापूर संस्थानात सक्तीच्या मोफत शिक्षणाचा कायदा केला. अनेक गावांमध्ये त्यांनी शाळा काढल्या. जे पालक आपल्या मुलांना शाळेत पाठवणार नाहीत त्या पालकांना प्रति महिना १ रुपया दंड आकारण्याची कायदेशीर तरतूद केली.

समाजातील दुर्लक्षित मागास-वर्गीय दुर्बल घटकांच्याप्रती त्यांचा दृष्टीकोन विशेष सहानुभूती व सुधारणावादी होता. त्यांचा आदर्श समाजापुढे विशेषत्वाने यावा या दृष्टीकोनातून त्यांचा जन्म दिवस २६ जून हा दरवर्षी ङ्कसामाजिक न्याय दिनफम्हणून साजरा करण्यात येतो, असे त्यांनी सांगितले.

यावेळी समाजभुषण प्राप्त शुध्दोधन सहारे, डॉ.सविता बेदरकर व सेवानिवृत्त समाज कल्याण उपायुक्त अनिल देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी इयत्ता १० वीत गोंदिया जिल्ह्यातून प्रथम आलेली विद्यार्थीनी खुशी सुहास सुखदेवे व १० वीत विभागीय मंडळाच्या शंभर विद्यार्थ्यांमध्ये प्राविण्यप्राप्त अक्षरा शैलेंद्र कोल्हे, तसेच इयत्ता १२ वीत देवरी तालुक्यातून प्रथम आलेला विद्यार्थी क्रिश मधुलाव चव्हाण व तिरोडा तालुक्यातून प्रथम आलेली विद्यार्थीनी याशिका राजेश गुणेरीया, त्याचप्रमाणे इयत्ता १० वीत शासकीय निवासी शाळ-ेतून प्राविण्यप्राप्त विद्यार्थी अक्षरा गोपीलाल मेश्राम, तन्मय खेमराज साऊस्कार, आर्या प्रदिप वैद्य, संचित मोरेश्वर शहारे, मोनिका रामकिशन देवांगण, रुतुजा अजय मेश्राम, कोमल लालचंद उके, दक्ष देवेंद्र मेश्राम, हेमंत गोवर्धन लाडे, सिमरन रामेश्वर नंदगाये यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आला.

तसेच राजेश दुलिचंद सेवतकर, प्रेमलाल अंकुश बर्वे, लक्ष्मण बाबुलाल सेवतकर, देवराम तिलकचंद तांडेकर, मिलिंद कोविंदा बिंझाडे, कल्पना माणिक बरियेकर, अभिमन मोतीराम बिंझाडे, धर्मेंद्र ओमकार जगणे, नरेश सुभाष बरैये, नरेंद्र कुंभारिया तांडेकर, सुजित विक्रम खरोले, विनोद भोजराज जगणे, जितेंद्र रामु छिपे, तेजराम दुलीचंद भोंडेकर, संजय सुखदेव चवरे, मंगेश शिवराम चौबे, अमित उमराव निकुरे, कपुरचंद शिवलाल कुलभजे, सुरेंद्र लकचंद कुलभजे, विरेंद्र प्रेमलाल मोहबे, राजेश भरतलाल कनोजे, भिकु मेहतर गायकवाड या गटई कामगारांना मान्यवरांच्या हस्ते पत्र्याचे स्टॉल वितरीत करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाज कल्याण सहायक आयुक्त किशोर भोयर यांनी केले. सुत्रसंचालन प्रमोद गणवीर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार हेमंत घाटघुमर यांनी मानले. कार्यक्रमास विद्यार्थी, विद्यार्थीनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाज कल्याण निरीक्षक स्व-ाती कापसे व राजेश मुधोळकर, लक्ष्मण खेडकर, प्रकाश मेश्राम अमित रंगारी, दिपक मेश्राम, पुष्पलता धांडे, आशिष जांभुळकर, पंकज काळे, निशांत वाघमारे, मानिकराव इरले, गिरीधर गोबाडे, योगेश हजारे, निवेदिता बघेले, विद्या मेश्राम, निवास सहारे व क्रिस्टल कंपनीचे कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.